महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : किरण मोरे


- वर्ष – पंधरावे
- अंक ३ रा
- १ एप्रिल २०२५




# ३७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन

## क्षणचित्रे





३७ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे उद्‌घाटन प्रसंगी दिप प्रज्वलन करतांना मान्यवर



३७ व्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष डॉ. अनिल माळी यांना अध्यक्षपदाची सुत्रे सोपवितांना महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर



संमेलनाची स्मरणीका पक्षीही सुस्वरे आळविते चे प्रकाशन करतांना मान्यवर



संमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी आयोजक महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी आयोजीत केलेल्या ग्रंथदिंडी व वृक्षदिंडीमध्ये मान्यवर



३७ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाला पक्षिप्रेमी व पक्षिनिरीक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला




संमेलनाच्या समारोप प्रसंगी उपस्थित प्रतिनिधी म्हणून आपले मनोगत व्यक्त करतांना सौ. विदुला कुळकर्णी,पुणे



संमेलनाच्या निमित्त्याने महाराष्ट्रभरातून गोळा झालेल्या पक्षिमित्रांसाठी जायकवाडी येथे पक्षिनिरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**संपादक**

**श्री. किरण मोरे**

विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड, मनोर मांगल्य जवळ,
अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९१००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

**मार्गदर्शक**

| | |
|---|---|
| **डॉ. निनाद शहा** | **श्री. अविनाश कुबल** |
| सोलापूर | ठाणे |

## कार्यकारिणी

| | |
|---|---|
| अध्यक्ष | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| संघटक | **डॉ. अनिल माळी,** नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सहसंघटक | **श्री. अविनाश कुबल,** ठाणे<br>मो. ९३२४२३८०३१ |
| सहकार्यवाह | **श्री. निनाद शहा,** सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | **कु. रूपाली सरोज,** रेवदंडा<br>मो. ९८६९५५९९२२ |
| सदस्य | **श्री. माणिक पुरी,** परभणी<br>मो. ९८८१९६७३४६ |
| सदस्य | **श्री. नितीन मराठे,** नागपूर<br>मो. ९४२११८९३३३ |
| सदस्य | **श्री. अमोल सावंत,** अकोला<br>मो. ९८२२७२८८२३ |

## सल्लागार मंडळ

श्री. भाऊ काटदरे (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
श्री. दिगंबर गाडगीळ (पूणे) मो. ९८८१०७९७११
डॉ. दिलीप यार्दी (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
डॉ. अनिल पिंपळापुरे (नागपुर) मो. ९८८१७१३४६६
श्री. बापुसाहेब भोसले (अहमदनगर) मो.९८२२६३३१३३
श्री. राजु कसंबे (मुंबई) मो.९००४९२४७३१

**मुखपृष्ठ –**
**छायाचित्रकार – श्री. किरण मोरे,** वन्यजीव पक्षी अभ्यासक
**छायाचित्राचे ठिकाण –** झाडगांव, जि. अमरावती
**छायाचित्रातील पक्षी –**'पळस मैना' Rozy Starling

# संपादकीय...



पक्षी निरीक्षक, संशोधक आणि नव्याने पक्ष्यांच्या प्रेमात पडलेल्यांचा वार्षिक उत्सव म्हणजे पक्षीमित्र संमेलन. यात यासर्वांच्या भेटीगाठी होतात, सादरीकरण, प्रात्यक्षिकाद्वारे संशोधक आपला पक्ष्यांचा अभ्यास सादर करतात. विचारांची देवाण घेवाण होते. त्यातून आणखी काही नवीन गवसते. आणि असे ३७ राज्यस्तरीय संमेलन यशस्वीरीत्या घेण्यात आली आहेत. तेही शासनाची कुठलीही मदत न घेता ! ही पक्षीप्रेमींसाठी एक मोठी उपलब्धी म्हणता येईल. यावेळी शेवगाव येथे झालेले ३७ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन असेच यशस्वीरीत्या पार पडले. त्याचा आढावा या सहाय्यक प्राध्यापक श्री सचिन पवार यांनी घेतला आहे. वर्धेतील बहार नेचर फाउंडेशनच्या सदस्यांनी वर्धा ते शेवगाव संमेलन स्थळ हा प्रवास सायकलीने पार केला. त्याचे वर्णन श्री अमोल मुनेश्वर यांनी आपल्या सायकल सफरनामा या लेखात सुंदर रीतीने वर्णन केला आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षीनिरीक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी अकोला येथे निसर्गकट्टा ही संस्था गेल्या सात वर्षापासून शालेय पक्षिमित्र संमेलन आयोजित करीत असते. यावेळी यशस्वीरीत्या पार पडलेले आठव्या पक्षिमित्र संमेलनाचा आढावा संस्थेचे सदस्य श्री अमोल सावंत यांनी घेतला आहे. २० मार्च ला महाराष्ट्रात जागतिक चिमणी दिवस मोठ्या उत्सवात साजरा केला गेला. गेल्या काही दशकामध्ये चिमण्यांची घटणारी संख्या आणि त्यामागील कारणे वैज्ञानिक कारणे, चिमण्यांचे जैवविविधतेतील महत्व महाराष्ट्र पक्षिमित्रचे कार्यकारिणी सदस्य श्री किशोर गठडी यांनी आपल्या लेखामध्ये विषद केले आहे. चिमणी दिवस साजरा करण्याचा उद्देश समाजामध्ये चिमण्यांच्या संवर्धनासाठी जनजागृती करणे हा असतो. त्यासाठी हा लेख मार्गदर्शक ठरेल. यावेळच्या अंकामध्ये पक्षी संशोधकानी आपली उपस्थिती दर्शविली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एका गावातील करकोच्याच्या वस्तीचे संवर्धन कशा पद्धतीने केले, याचे सुंदर वर्णन येथीलच प्राध्यापक निखील बोराडे यांनी केले आहे. रिव्हर लॅपविंगवर पीचडी सुरु असलेल्या शिवाजी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी श्री प्रतिक चौधरी यांनी मेळघाटमधील तापी नदीवरील रिव्हर लॅपविंगची सद्यस्थिती वर्णन केली आहे. तसेच अमरावती जिल्ह्यातील अप्परवर्धा जलाशयावरील पक्ष्यांवर प्रा. अश्विन लुंगे यांची पीएचडी सुरु आहे. त्यांनी आपल्या लेखात या जलाशयावरील पक्ष्यांचे वैभव अधोरेखित केले आहे. श्री वामनाचार्य गेल्या तेरा वर्षापासून नियमितपणे पक्षिमित्र अंकात टपाल तिकीटांच्या दुनियेत हे सदर लिहितात. या सदराद्वारे आपल्याला पक्ष्यांच्या देशविदेशातील पोस्टल तिकिटांची माहिती वाचावयास मिळते. या अंकात त्यांनी तांबट या पक्ष्याची माहिती आपल्या समोर सादर केली आहे. नव्याने सुरू झालेल्या छायाचित्राची गोष्ट या लोकप्रिय सदरात अमरावती मधिल श्री. अमेय ठाकरे यांनी तिबोटी खंड्या या पक्ष्याचे छायाचित्र कसे घेतले या बद्दलचा अनुभव कथन केला आहे. असा हा विविध विषयांनी नटलेला एप्रिलचा अंक आपल्या समोर आणण्यात आनंद होत आहे. आपला हा अंक निश्चितच वाचकांच्या पसंतीस उतरेल यात शंका नाही.

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

नमस्कार

महाराष्ट्र पक्षिमित्रचे ३७वे संमेलन अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथे १ व २ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाले. न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेजच्या यजमानपदाखाली हे संमेलन यशस्वीपणे पार पडले. तालुक्याच्या ठिकाणी आणि एका महाविद्यालयाने पुढाकार घेऊन केलेले हे पहिलेच संमेलन. त्यामुळे या आडवाटेवरील ठिकाणी असलेल्या या गावात किती लोक येतील अशी शंका अनेकांना होती. महाविद्यालयात असलेले संमेलन कसे असेल असाही प्रश्न बऱ्याच जणांना पडला असावा, मात्र या सर्व शंका व प्रश्नांचा कुठलाही विचार न करता आयोजकांनी अथक परिश्रम व अचूक नियोजन करून संमेलन यशस्वी करून दाखविले. शेवगावसारख्या ठिकाणी संपूर्ण राज्यातून १००हून अधिक पक्षिमित्र पोहोचले. हे संमेलन त्यांच्या शेवगावात व्हावे ही पक्षिमित्रचे मार्गदर्शक श्री. बापूसाहेब भोसले यांची इच्छा होती. त्यास अनुसरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी पुढाकार घेऊन आयोजनाची जबाबदारी अंगावर घेतली. महाविद्यालाच्या संचालक मंडळाने सुद्धा सहमती दिली आणि या सर्वांच्या सहकार्याने संमेलन अतिशय नेटकेपणाने पार पडले. व्यवस्था उत्तम होती, सादरीकरणे उत्तम झाली. यामध्ये विशेष उल्लेख करावा लागेल तो महाविद्यालयातील प्रा. सचिन पवार यांचा. त्यांनी समन्वयकाची भूमिका उत्तमरीत्या पार पाडली, त्यांचे अभिनंदन. महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे आयोजकांचे आभार.

संमेलन झाल्या-झाल्या दि. ५ जानेवारीला सर्व समाजमाध्यमांवर अनेकांनी 'राष्ट्रीय पक्षीदिवस', साजरा केला. पोस्ट्स आणि मेसेजेसचा दिवसभर मारा होत होता. दरवर्षी यादिवशी अशा पोस्ट्स टाकल्या जातात. परंतु, हा दिवस भारतात साजरा केला जातो का? किंवा साजरा करावा का? असा प्रश्न कुणालाही पडत नाही. फक्त आला मेसेज की ढकल पुढे, कुणाची पोस्ट दिसली की आपणही टाकलीच पाहिजे याची सर्वांनाच घाई. आदल्या दिवशी सायंकाळी एका जेष्ठ वृत्तपत्र प्रतिनिधींचा फोन आला. हा दिवस भारतात साजरा केला जातो का, असा त्यांचा प्रश्न होता. त्यांनी माहिति घेतली व त्याबाबत बातमी करायचे थांबविले.अशी जिज्ञासा फार कमी वेळा बघायला मिळते. मुळात ५ जानेवारी हा दिवस युरोपातील अनेक देशात सुमारे १३० वर्षांपासून साजरा करण्याची परंपरा असून, १९७९पासून तेथील अनेक संस्था पुढाकार घेऊन अनेक कार्यक्रम आयोजित करतात. तिकडील जवळपास सर्व नागरिक सुट्टी घेऊन हा दिवस पक्षी निरीक्षण करून साजरा करतात. पुढे अमेरिकेतसुद्धा हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.युरोपात जवळपास २० टक्के पेक्षा जास्त नागरिक नियमित पक्षीनिरीक्षक आहेत. अमेरिकेतहीही संख्या कोटींमध्ये आहे. इकडचा विचार करता, आपल्या देशात मोठ्या मुश्किलीने १५-२० हजार पक्षीनिरीक्षक असावेत. 'ई-बर्ड'वर नोंदी करणाऱ्या पक्षीनिरीक्षकांची संख्या फक्त १२००० इतकी आहे. देशाच्या लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण ०.००१टक्के इतके असावे. मात्र, समाजमाध्यमांवर या 'राष्ट्रीय पक्षीदिवस', निमित्ताने लाखो लोक व्यक्त झाले असतील. आपल्या देशात थोर पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सलीमअली यांचा १२ नोव्हेंबर हा जन्मदिवस आपण राष्ट्रीय पक्षीदिवस म्हणून साजरा करीत असतो. याशिवाय ५ ते १२ नोव्हेंबर हा आठवडा पक्षीसप्ताह म्हणून महाराष्ट्रात साजरा केला जातो. त्यामुळे, ५ नोव्हेंबर हा दिवस आपल्या देशाचा राष्ट्रीय पक्षीदिवस नाही,एवढेच सांगायचे आहे.

समाजमाध्यमांच्या वाढत्या आकर्षणामुळे अनेकदा पक्ष्यांस व त्यांच्या अधिवासास इजा पोहोचविण्याच्या घटना निदर्शनास येत असतात. जानेवारी महिन्यात इंस्टाग्रामवरील अशीच एक रील मला आपल्या एका सभासदाने पाठविली. या रीलमध्ये एक व्यक्ती मालवण जवळील एका बेटावर असलेल्या सागरी गरुडाच्या घरट्याजवळ जाऊन ते घरटे दाखवित होता. सध्या हा पक्षी येथे नाही, असेही सांगत होता. सागरी गरुड एकतर अतिशय महत्त्वाचा व दुर्मिळ पक्षी. त्याची संख्या सध्या झपाट्याने रोडावत आहे. रीलमध्ये दाखवलेले घरटे वापरातील होते. त्यामुळे हा पक्षी ते घरटे सोडून जाण्याचीशक्यता नाकारता येत नाही. त्याची ही कृती नैतिक नियमनाच्या विरुद्ध असून घरट्याला इजा पोहोचवली म्हणून वन्यजीव संवर्धन कायद्यांतर्गत त्यावर कारवाईसुद्धा केली जाऊ शकते. मी रील बघताच त्या भागातील परिचित पक्षीमित्रांना व आमच्या मानद वन्यजीव रक्षक मित्रांना फोन करून माहिती दिली. आपले सदस्य व माझे सहकारी कराड येथील श्री. रोहन भाटे यांनी मालवण भागातील वन अधिकाऱ्यांना या रीलची माहिती दिली. त्याची दाखल घेऊन या रीलकर्त्यास वन विभागाने तातडीने वन विभागात पाचारण केले.त्याची चौकशी करून व त्यास तंबी देऊन रील डिलीट करण्यास सांगून या प्रकरणास पूर्णविराम दिला.

या व अशा अनेक बाबींमुळेपक्ष्यांना इजा पोहोचविणाऱ्या लोकांवर लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. आपणास असा प्रकार आढळल्यास तातडीने संबंधित अधिकारी किंवा पक्षिमित्र यांच्याकडे त्याची माहिती कळवावी. जेणेकरून, अशा प्रकारांना आळा बसू शकेल.

आता पुढील संमेलनाविषयी– पुढील ३८वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन माझ्या गावात अमरावती येथे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या (WECS) यजमानपदाखाली येत्या नोव्हेंबरमध्ये, दिवाळीनंतर होणार आहे. आमच्या WECS संस्थेचे यावर्षी रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने आम्ही हे संमेलन अमरावती येथे घेण्यासाठी उत्सुक होतो. यापूर्वी याच संस्थेने २०१३ यावर्षी २६व्या संमेलनाचे यशस्वी आयोजन केले होते. त्यामुळे, यावर्षीचे संमेलन भव्य व अविस्मरणीय करण्याचा आमचा मानस आहे. हे संमेलन अखिल भारतीय व्हावे यासाठीसुद्धा प्रयत्न राहील. या संमेलनास जोडून काही कार्यशाळा व विविध स्पर्धांचे आयोजनही केले जाणार आहे. तेव्हा अमरावतीला येण्याचे नियोजन करा! आम्ही आपल्या स्वागतास उत्सुक आहोत. मिळून सारे जण। करू द्विजगन रक्षण ।।

*****




**जेष्ठ पक्षीअभ्यासक श्री. गोविंद सबनीस यांना महाराष्ट्र पक्षिमित्र जीवनगौरव पुरस्कार प्रदान करतांना मान्यवर**




**श्री. फिरोज चाऊस यांना पक्षिसंवर्धन पुरस्कार प्रदान करतांना मान्यवर**




**उदयोन्मुख पक्षीनिरीक्षण पुरस्कार श्री.सुशांत मनवरे यांना प्रदान करतांना मान्यवर**



**श्री. माणिक पुरी यांना पक्षिसाहित्य पुरस्कार प्रदान करतांना मान्यवर**



**श्री. राहुल वकारे यांना पक्षि जनजागृती पुरस्कार प्रदान करतांना मान्यवर**

# पक्षीमित्र संमेलन अहवाल

**महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना संयोजित अहमदनगर जिल्हा**
**मराठा विद्या प्रसारक समाजाचे**
**न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव**
**आयोजित ३७ वे महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलन, शेवगाव**




**श्री. सचिन पवार**
सहाय्यक प्राध्यापक
शेवगांव
Email - pawar.ss0408@gmail.com


२३ डिसेंबर २०२३ ला मी प्राध्यापक सचिन पवार व पक्षीमित्र संघटनेचे ज्येष्ठ सल्लागार मा. श्री बापूसाहेब भोसले, ३६ वे पक्षीमित्र संमेलनासाठी सांगली या ठिकाणी गेलो होतो त्यावेळी आम्ही आमच्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजचे न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव महाविद्यालयाच्या वतीने पुढील वर्षीचे पक्षीमित्र संमेलन हे न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव या ठिकाणी घ्यावे यासाठीचे विनंती पत्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर सर व त्यांचे सहकारी यांच्याकडे सुपूर्त केले त्यानंतर त्यांच्या बैठकीमध्ये आम्हाला पक्षीमित्र संमेलन घेण्यास संघटनेकडून परवानगी मिळाली. तसे संघटनेकडून आम्हाला रीतसर पत्रही मिळाले व त्यानंतर मे २०२४ मध्ये पक्षी मित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर सर कार्यवाह डॉ. गजानन वाघ तसेच संघटनेचे संघटक डॉ. सुधाकर कुऱ्हाडे व मा. श्री बापूसाहेब भोसले यांनी महाविद्यालयात येऊन मा. प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, उपप्राचार्य डॉ युवराज सूडके प्राध्यापक सचिन पवार या यांच्यासह एक बैठक आयोजित करून पुढील संमेलनाची रूपरेषा ठरविण्यात आली व त्यामध्ये संमेलनाची तारीख ही १ फेब्रुवारी व २ फेब्रुवारी २०२५ हे ठरविण्यात आली त्यानंतर आम्ही पुढील तयारी सुरुवात केली होणाऱ्या पक्षीमित्र संमेलनाच्या अनुषंगाने आम्ही अहमदनगर जिल्ह्यातील पक्षीमित्र यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी अहिल्यानगर येथील पक्षी मित्रांची अहिल्यानगर या ठिकाणी एक बैठक घेतली त्या बैठकीस ही आम्हाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला व त्यादरम्यान पक्षीमित्र संमेलनानिमित्त महाविद्यालयात तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्याचे ठरले. स्पर्धेचा विषय माझ्या परिसरातील पक्षी ही थीम विद्यार्थ्यांना देण्यात आली. चित्रकला स्पर्धा दि १८/१/२०२५ रोजी महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. चित्रकला स्पर्धेसाठी तालुक्यातून जवळपास २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. चित्रकला स्पर्धा ही आपण तीन गटांमध्ये आयोजित केली होती त्यामध्ये गट क्रमांक एक ५वी ते ८वी गट, क्रमांक दोन ९वी ते १०वी आणि गट क्रमांक तीन ११वी व १२वी असे गट स्पर्धकांसाठी आपण ठरवले होते. त्यामध्ये गट क्रमांक एक इ ५ वी ते ७ वी मधून प्रथम क्रमांक कु. भूमी प्रवीण उगले इयत्ता ७वी रेसिडेन्सी हायस्कूल, शेवगाव द्वितीय– कुमारी समृद्धी संदीप सानप इयत्ता ७वी आबासाहेब काकडे विद्यालय शेवगाव, तृतीय कु. आराध्या अमोल मुंडणकर इयत्ता ६वी. बाळासाहेब भारदे विद्यालय शेवगाव. गट क्रमांक दोन मधून प्रथम क्रमांक कु. प्रसाद सोपान पोटभरे इयत्ता नववी आबासाहेब काकडे विद्यालय शेवगाव, द्वितीय क्रमांक पूनम लक्ष्मण चितळे इयत्ता नववी एकनाथ माध्यमिक विद्यालय शेवगाव, तृतीय क्रमांक कु ऋचा तुकाराम चिक्षे इयत्ता नववी बाळासाहेब भारदे हायस्कूल शेवगाव. व गट क्रमांक तीन मधून प्रथम क्रमांक विपुल शितल गोरे इयत्ता बारावी आबासाहेब काकडे कॉलेज शेवगाव यांनी मिळवला. रील स्पर्धा माझ्या परिसरातील पक्षी यावर घेण्यात आली यामध्ये प्रथम क्रमांक सचिन साळुंखे, द्वितीय क्रमांक मृणाल दत्तात्रय परदेशी व तृतीय क्रमांक करुणा धोपटे. या विद्यार्थ्यांनी मिळविला, विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र स्मरणिका व रोख रक्कम स्वरूपात पारितोषिक देण्यात आली.. वरील स्पर्धेसाठी आपण प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक काढून सहभागींना प्रमाणपत्र व बक्षीस पक्षीमित्र संमेलनामध्ये सुपूर्त केली. या संमेलनासाठी महाराष्ट्रातून येणाऱ्या पक्षिमित्रांसाठी महाविद्यालयाने दोन दिवसाच्या राहण्याची व्यवस्था केली होती. महाविद्यालयातील सर्व टीम आत्ता पक्षीमित्र संमेलन साठी तयार झाली होती. संमेलनासाठी ३१ जानेवारी रोजी वर्धा या ठिकाणाहून चार सायकल स्वार संमेलनासाठी महाविद्यालयात हजर झाले. त्या मध्ये बहार नेचर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष किशोर वानखेडे संस्थापक सचिव दिलीप वीरखेडे सदस्य अँड प्रसाद सोईतकर व अमोल मुनेश्वर यांनी वर्धा ते शेवगाव सायकलवर प्रवास करून पक्षी मित्र संमेलनासाठी हजेरी लावली दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी पक्षीमित्र संमेलनाची सुरुवात झाली यासाठी प्रथमतः महाराष्ट्रभरातून आलेल्या पक्षी मित्रांसाठी नोंदणी कक्ष उपलब्ध करून देण्यात आला होता, नोंदणी कक्षामध्ये आलेल्या पक्षी मित्रांनी आपले नाव नोंदणी केली नोंदणी झाल्यानंतर पक्षीमित्रांनी एक शबनम बॅग स्मरणिका, तुषार्त, ओळखपत्र नोटपॅड पेन असलेली सुंदर कीट वितरित करण्यात आली व त्यानंतर नाश्ता चहा झाल्यानंतर दहा ते अकरा या वेळेत ग्रंथदिंडी व वृक्षदिंडी चे आयोजन

करण्यात आले होते महाविद्यालयातील ७० ते ८० विद्यार्थी या ग्रंथदिंडी व वृक्षदिंडी मध्ये टाळ मृदुंगाच्या गजरात वारकरी वेश परिधान करून सहभागी झाले. या दिंडीसाठी संमेलन अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, संस्थेचे सचिव महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व प्राध्यापक सर्व पक्षीमित्र उपस्थित होते. ग्रंथदिंडी व वृक्षदिंडी ही शेवगाव येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातून निघून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून वृक्ष व ग्रंथ ची मिरवणूक काढून परत महाविद्यालयात आली त्यानंतर संमेलन अध्यक्ष डॉ अनिल माळी, प्रमुख पाहुणे प्रो डॉ प्रवीण सप्तर्षी मा. बैजु पाटील, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव अँड मा श्री विश्वासराव आठरे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे उपप्राचार्य सर्व महाराष्ट्रातून आलेले पक्षिमित्र महाविद्यालयातील सर्व शाखांचे विभाग प्रमुख प्राध्यापक संमेलनाचे समन्वयक इत्यादींच्या उपस्थितीत महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन पूर्ण झाले व त्यानंतर पक्षीमित्र संमेलन निमित्त भरविण्यात आलेल्या फोटो व चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन सन्माननीय अतिथींच्या हस्ते करण्यात आली त्यानंतर सर्व मान्यवर हे संमेलन स्थळ राजश्री शाहू महाराज सभागृह या ठिकाणी संमेलनाच्या उद्घाटनासाठी उपस्थित झाली. पाणथळ आणि पाणपक्षी ही मध्यवर्ती संकल्पना घेऊन संमेलनाच्या उद्घाटनासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून प्रोफेसर डॉ. प्रवीण सप्तर्षी ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ हे प्रमुख उद्घाटक म्हणून लाभले, त्याचबरोबर संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून डॉ. अनिल माळी त्याचबरोबर, प्रमुख उपस्थिती श्री बैजू पाटील जागतिक छायाचित्रकार तसेच अँड विश्वासराव आठरे पाटील सचिव अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अहिल्यानगर तसेच डॉ. जयंत वडतकर अध्यक्ष महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटना महाराष्ट्र तसेच डॉ. गजानन वाघ कार्यवाह महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटना, तसेच संमेलन स्वागत अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पक्षीमित्र तथा पक्षीमित्र संघटनेचे ज्येष्ठ सल्लागार मा. बापूसाहेब भोसले यांनी पद भूषविले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पुरुषोत्तम कुंदे उपप्राचार्य डॉ युवराज सुडके आदींच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. संमेलनाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. त्यानंतर दीप प्रज्वलन करून पक्षिमित्रांचे आराध्यदैवत मानले जाणारे डॉ. सलीम आली यांच्या प्रतिमेचे पूजन करून संमेलनात सुरुवात झाली. संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाचे प्रास्ताविक महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर सर यांनी केले व त्यानंतर परिचयात्मक मनोगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे सर यांनी केले. त्यानंतर पक्षीमित्र संमेलन शेवगावचे स्वागत अध्यक्ष मा. श्री बापूसाहेब भोसले यांनी आपले स्वागतपर मनोगत व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित अतिथींचा सन्मान करण्यात आला.

त्यानंतर पक्षीहि सुस्वरें आळविती ही स्मरणिका पक्षीमित्र संमेलनानिमित्त प्रकाशित करण्यात आली. स्मरणिकेमध्ये महाराष्ट्रातून आलेल्या पक्षी मित्रांचे अनुभव व पक्षी मित्रांनी लिहिलेले लेख छापण्यात आले स्मरणिकेसाठी अतिथी संपादक म्हणून डॉ. सुधाकर कुऱ्हाडे तसेच संपादक म्हणून डॉ पुरुषोत्तम कुंदे, डॉ वसंत शेंडगे, डॉ युवराज सुडके, डॉ उषा शेरखाने प्राध्यापक सचिन पवार यांनी काम पाहिले यानंतर पक्षी विषयी जनजागृती हे पुस्तक संमेलन अध्यक्ष डॉ अनिल माळी यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन संमेलनामध्ये करण्यात आले यानंतर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले यामध्ये या पुरस्काराचे निवेदन पक्षीमित्र संघटनेचे कार्यवाह डॉ. गजानन वाघ सर यांनी केले

महाराष्ट्र पक्षीमित्र जीवनगौरव पुरस्कार पंढरपूर येथील गोविंद सबनीस, पक्षी संवर्धन पुरस्कार निपाणी बेळगाव येथील फिरोज चाऊस, पक्षी साहित्य पुरस्कार परभणी येथील माणिकपुरी, जनजागृती पुरस्कार वर्धा येथील राहुल वकारे, उदयन्मुख पक्षी निरीक्षण पुरस्कार शेवगाव येथील सुशांत मनवरे तर पक्षी फेलोशिप स्कॉलरशिप दहा हजार रुपयांचा धनादेश व सन्मानचिन्ह कपिल दैवत यांना प्रदान करण्यात आले. यानंतर पक्षीमित्र संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा व रीलस स्पर्धा या स्पर्धेचे बक्षीस वितरण स्पर्धकांना करण्यात आले.

यानंतर ३७ वे पक्षीमित्र संमेलन शेवगाव साठी प्रमुख उद्घाटक म्हणून लाभलेले प्रमुख पाहुणे डॉ. प्रवीण सप्तर्षी सर यांनी संमेलनास मार्गदर्शन केले. त्यांच्या मते केवळ स्वतःपुरताच विचार न करता सर्व जीवसृष्टीचा विचार करणे हे पक्षांकडून मानवाने शिकण्याची गरज आहे. पक्षी हे सृष्टीतील एक सुंदर रत्न आहे पण मानवी हस्तक्षेपामुळे पक्षांच्या अधिवासाचा व पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. निसर्गाचे संतुलन टिकवण्यासाठी पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ व संमेलनाचे उद्घाटक प्रो डॉ प्रवीण सप्तर्षी यांनी मांडले.

यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले जागतिक छायाचित्रकार मा. श्री बैजू पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव अँड मां श्री विश्वासराव आठरे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज ही महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक असलेली एक संस्था आहे गेली १०० वर्षाहून अधिक काळ ही संस्था शैक्षणिक समर्थपणे चालवत आहे. या संस्थेचे शेवगाव येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव दिनांक एक व दोन फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय पक्षि मित्र संमेलन आयोजित केले आहे. या संमेलनास शुभेच्छा देताना संस्थेच्या गतवैभवात ऐतिहासिक मागवा घेणे मला फार गरजेचे वाटते सन १९१४ पासून मराठा शिक्षण

चळवळीला महाराष्ट्रभर सुरुवात झाली त्यातून मराठा बोर्डिंग मराठा शिक्षण परिषदा शिक्षण संस्था यांच्या स्थापनेला सुरुवात झाली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बोर्डिंग ची स्थापना करून शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक बदलाच्या प्रक्रियेला सुरुवात केली. संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना महाविद्यालयीन व विद्यालय स्तरावर प्रोत्साहन दिले जाते. न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव व महाराष्ट्र पक्षि मित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३७ वे महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलन शेवगाव येथे होत आहे या संमेलनासाठी महाराष्ट्रातून अनेक नामांकित पक्षीमित्र सहभागी असून त्याचा अनुभव व ज्ञानाचा फायदा आमच्या विद्यार्थ्यांना यानिमित्ताने होईलच. या कार्यक्रमानिमित्त स्मरणिका प्रकाशित करण्याचा कौतुकास्पद उपक्रम संयोजकांनी केला आहे असे प्रतिपादन सेक्रेटरी साहेब यांनी केले. यानंतर संमेलन अध्यक्ष डॉ. अनिल माळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले प्रथमतः ३७ वे पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष म्हणून माझी निवड केली बद्दल अनेक आभार त्यांनी व्यक्त केले ही जबाबदारी मी अत्यंत काळजीपूर्वक पणे पार पाडीन आणि या संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्र पक्षीमित्र चळवळीला एक नवी दिशा देण्याचे कळकळीचे प्रयत्न करील. हे मनःपूर्वक आश्वासन त्यांनी दिले या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे हे ग्रामीण भागात होत आहे. या शैक्षणिक वस्तूच्या विचार मंचावर पक्षी संरक्षणाचे रोपटे लावले जात आहे. हा विचार सर्वत्र दूर पसरेल हे नक्की असे प्रतिपादन संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल माळी सर यांनी केले. अध्यक्ष भाषणानंतर ३७ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे समन्वय पक्षीमित्र प्राध्यापक सचिन पवार यांनी सर्वांचे आभार मानले व उद्घाटनाचा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक सोपान नवथर सर यांनी केले या ठिकाणी उद्घाटन समारंभसंपन्न झाला याप्रसंगी जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे सचिव अँड श्री विश्वासराव आठरे पाटील जागतिक छायाचित्रकार बैजू पाटील महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे अध्यक्ष जयंत वडतकर प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे माजी प्राचार्य शिवाजीराव देवढे, बापूसाहेब भोसले आदी उपस्थित होते. यानंतर जायकवाडी पक्षांचा रंग मंच ही चित्रफीत न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज महाविद्यालयाने तयार केलेली संमेलनाच्या वेळी दाखविण्यात आली. यानंतर महाराष्ट्रभरातून आलेल्या काही पक्षी मित्रांची सादरीकरण या संमेलनात झाली .

१. पक्षांची जडले नाते या विषयावर श्री माणिकपुरी परभणी यांनी आपले सादरीकरण दिले त्यानंतर

२. पाणथळी धोके आणि संवर्धन या विषयावर डॉ. सुधाकर कुऱ्हाडे अहिल्यानगर यांनी आपले सादरीकरण दिले

या सादरीकरणानंतर दुपारी भोजनासाठी सर्वजण भोजन स्थळी गेले ३ वर्धा जिल्ह्यातील पाणथळी आणि पक्षी या विषयावर श्री राहुल प्रदीप वाकारे वर्धा यांनी आपले सादरीकरण दिले

४ धुळे जिल्हा पानपक्षी २०१४ ते २०२४ दशकातील बदल एक दृष्टिक्षेप या विषयावर डॉ विनोद भागवत धुळे यांनी आपले सादरीकरण दिले

५ पाणथळ पक्षी संवर्धन आणि एनपी २०२० या विषयावर डॉ. मिलिंद शिरभाते अकोला यांनी आपले सादरीकरण दिले.

६ अप्पर वर्धा जलाशयातील पान पक्षांची विन आणि धोके या विषयावर डॉ. अश्विन लुंगे मोर्शी अमरावती यांनी आपले सादरीकरण दिले

७ भारतीय टपाल तिकिटावरील पाणपक्षी या विषयावर श्री रवींद्र वामनाचार्य नाशिक यांनी आपले सादरीकरण दिले.

या सादरीकरणानंतर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा राजश्री शाहू सभागृहामध्ये पार पडली

त्यानंतर रात्री आठ नंतर भोजन स्थळी सर्वांची भोजनाची व्यवस्था केली होती सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

**संमेलनाचा दुसरा दिवस –दिनांक २/ फेब्रुवारी /२०२५**

आम्ही सर्व पक्षीमित्र मित्रांना घेऊन जायकवाडी पक्षी अभयारण्य पैठण या ठिकाणी पक्षी निरीक्षण सहलीसाठी महाविद्यालयातून ठीक पाच वाजता निघालो. आम्ही दोन बस घेऊन जवळपास ८०– ९० पक्षीमित्र जायकवाडी पक्षी अभयारण्यातील सोनेवाडी या ठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी सर्वजण पोहोचलो त्यावेळी त्या ठिकाणी असलेले स्थानिक पक्षीमित्र प्राध्यापक सुनील पायगन सर यांनी जायकवाडी पक्षी अभयारण्य व जलाशया विषयीची माहिती सर्वपक्षी मित्रांना दिली यावेळी पक्षिमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर सर कार्यवाहक गजानन वाघ, पक्षिमित्र संघटनेचे सर्व पदाधिकारी संमेलनास उपस्थित असलेले पक्षीमित्र तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पुरुषोत्तम कुंदे संमेलनाचे समन्वयक प्राध्यापक सचिन पवार प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उषा शेरखाने इत्यादी सर्व प्राध्यापक देखील त्या ठिकाणी उपस्थित होता आम्ही सर्व पक्षी मित्रांनी त्या ठिकाणी पक्षी निरीक्षणाचा आनंद घेतला. पक्षी निरीक्षण झाल्याच्या नंतर आम्ही जायकवाडी पक्षी अभयारण्य या ठिकाणाहून ठीक नऊ वाजता महाविद्यालयाच्या दिशेने निघालोत महाविद्यालयांमध्ये पोहोचल्यानंतर सर्वपक्षी मित्रांच्या चहा नाष्टा महाविद्यालयांमध्ये पार पडला व द्वितीय दिवसाच्या सादरीकरणासाठी सुरुवात झाली

८. नाशिक जिल्ह्यातील पाणथळी आणि पक्षी जीवन डॉ. अनिल माळी सर यांनी या विषयावर मार्गदर्शन केले त्यानंतर

९. सातपुड्याच्या नदी परिसंस्थेतील मलबार पाईड हॉर्नबिल या विषयावर डॉ. गजानन वाघ अमरावती यांनी आपले सादरीकरण दिले
१०. महाराष्ट्रातील पाणथळ आणि पक्षी निरीक्षण संस्थांचा अभ्यास आणि नोंदणी या विषयावर श्री अविनाश कुबल मुंबई यांनी आपले सादरीकरण दिले
११. पानपक्षी त्याचा विणीचा हंगाम आणि त्याचे आवाज या विषयावर पक्षीमित्र संघटनेचे मा. श्री शरद आपटे सर सांगली यांनी आपले सादरीकरण दिले
१२. तापी नदीतील नदी टिटवीची सद्यस्थिती प्रतीक चौधरी अमरावती यांनी आपले सादरीकरण दिले
यानंतर
१३. गवताळ व पडीक जमीन भागातील पक्षी जैवविविधता या विषयावर कपिल दैवत अमरावती यांनी आपले सादरीकरण दिले १४ संमेलनाचे आकर्षण ठरलेला छोटा पक्षीमित्र अवघ्या पाच ते सहा वर्षे वयाचा अर्पित चौधरी यांनी आपले सादरीकरण करून दाखवले त्यामध्ये तो कोणत्याही क्षणाला जवळपास ५०० पक्षी ओळखू शकत होता १५. यानंतर कवी बाळासाहेब मुंतोडे राहुरी यांनी आपली कविता सादर करून सर्व पक्षी मित्रांना कविता ऐकवण्याचा आनंद दिला सादरीकरण सत्राचे सूत्रसंचालन प्राध्यापिका आशा वडणे व प्राध्यापिका गोरखे मॅडम यांनी केले सर्वांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण झाल्यानंतर दुपारच्या भोजनासाठी सर्वपक्षीमित्र उपस्थित मान्यवर भोजन स्थळी गेली भोजन पार पडल्यानंतर समारोप समारंभाची सुरुवात करण्यात आली
दुपारच्या सत्रातील समारोपीय कार्यक्रमात प्राचार्य डॉ पुरुषोत्तम कुंदे यांनी प्रास्ताविक केले अध्यक्ष संस्थेच्या खजिनदार मा श्रीमती दिपलक्ष्मी म्हसे, प्रमुख पाहुणे मा श्रीमती निर्मलाताई काटे,, मा श्री बापुसाहेब भोसले, मा डॉ अनिल माळी, डॉ गजानन वाघ, मा डॉ जयंत वडतकर इ उपस्थित होते. त्यांचे स्वागत करण्यात आले.

*मा बापुसाहेब भोसले यांनी या संमेलना करिता संस्थेच्या वतीने कसोशीने प्रयत्न केले व आपली व्यवस्था केली आपण नविन पिढीला सोबत घेतल्याशिवाय सामोर जाऊ शकत नाही. म्हणुन सर्वांनी पक्षांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करावे. असे सांगीतले.
* मा डॉ जयंत वडतकर यांनी या पक्षिमित्र संमेलनात वेगवेगळ्या भागातुन वेगवेगळ्या व्यवसायाचे पक्षिमित्र आलेत. संस्थेने त्यांची व्यवस्था उत्तम केली. सर्वांनी चांगली मेहनत घेऊन कार्यक्रम साजरा केला. त्यासाठी मंडळ संस्थेचे ऋणी आहे व पुढील अधिवेशन अमरावती येथे २५-२६ नोव्हेंबर २०२५ ला घेण्याचे ठरविले आहे. असे सांगुन स्वागतपर मनोगत व्यक्त केले.
* पक्षिमित्रांचे मनोगत - विदुला कुलकर्णी, दिगंबर महाजन, डॉ ललीत शिरभाते. श्री लाड सेवानिवृत्त सहाय्यक वनसंवर्धन तज्ञ म.रा. नागपुर इत्यादींनी या संमेलनाचे आयोजनाबाबत आपआपले मनोगत व्यक्त केले.
*प्रकाशन - निसर्ग कट्टा तर्फे किलबिलाट या मासिकाचे विमोचन करुन प्रकाशित केले.
*निसर्ग कट्टा च्या संपादक मंडळाचा सत्कार करण्यात आला.
*श्रीमती निर्मलाताई काटे - पक्षांचे संरक्षण करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे व त्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे व जी काही मदत लागत असेल ती द्यायला ही संस्था सदैव तत्पर आहे असे सांगितले.
* अध्यक्षीय भाषण - श्रीमती दिपलक्ष्मी म्हसे यांनी पक्षीमित्र संमेलने ही समाजापुरतेच न राहता त्यात शालेय मुलांचा समावेश करावा. लहान मुलं ही अनुकरण प्रिय असतात त्यांच्यावर हे संस्कार बिंबवणे महत्वाचे आहे. त्यासाठी पक्षिमित्र संघटनेला मदत करुन वेगवेगळे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न आमची संस्था करेल याची ग्वाही दिली. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन प्राध्यापक सोपान नवथर यांनी केले
*आभार प्रदर्शन डॉ गोकुळ क्षीरसागर यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम संपल्याचे संचलनकर्त्यांनी जाहिर केले.

*****






# जागतिक चिमणी दिवस
# वैज्ञानिक दृष्टिकोनातून एक आठावा



**श्री. किशोर गठडी**
सचिव, निसर्गमित्र मंडळ व
सहसंघटक, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना

२० मार्च हा जागतिक चिमणी दिवस दरवर्षी चिमणी या छोट्या, परंतु पर्यावरणासाठी महत्त्वाच्या पक्ष्याबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. २०१० मध्ये नेचर फॉरएव्हर सोसायटी ऑफ इंडिया (NFSI) आणि इतर पर्यावरण संस्थांनी चिमण्यांच्या घटत्या संख्येकडे लक्ष वेधण्यासाठी हा उपक्रम सुरू केला. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, चिमणी (Passer domesticus) ही केवळ एक सामान्य पक्षी नाही, तर जैवविविधतेची सूचक (Indicator Species) आणि पर्यावरणीय संतुलनाची आधारशिला आहे.

**चिमणीचे जैवविविधतेतील योगदान** चिमणी ही सर्वभक्षी प्रजाती असून, ती कीटक, बिया, धान्याचे कण आणि मानवी अन्नाचे अवशेष खाते. खाद्य शृंखलेत ती मध्यस्थ म्हणून कार्य करते, ज्यामुळे कीटक आणि वनस्पती यांच्यातील संतुलन राखले जाते. शेतीत हानिकारक कीटकांचे नियंत्रण करून ती कीटकनाशकांचा वापर ३०-४०% पर्यंत कमी करते, असे संशोधन दर्शवते. यामुळे शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळते आणि माती व पिकांचे आरोग्य सुधारते.चिमणी परागणात थेट सहभागी नसली, तरी ती कीटकांची संख्या नियंत्रित करून अप्रत्यक्षपणे परागकणांना मदत करते. उदाहरणार्थ, फुलांवर हल्ला करणाऱ्या कीटकांना ती आटोक्यात ठेवते, ज्यामुळे मधमाश्या आणि फुलपाखरांसारख्या परागकण प्रजातींचे कार्य सुलभ होते. तसेच, चिमण्यांची विष्टा जमिनीची सुपीकता वाढवते, ज्यामुळे सूक्ष्मजीवांचे जीवनचक्र सुरळीत राहते. अशा रीतीने, चिमणी जैवविविधतेतील अनेक घटकांना जोडणारा पूल आहे.

**संख्येतील घट: वैज्ञानिक कारणे** गेल्या काही दशकांत चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. याची वैज्ञानिक कारणे पुढीलप्रमाणे आहेत

**निवासस्थानांचा नाश:** शहरीकरणामुळे पारंपरिक मातीची घरे, झाडांच्या ढोली आणि कोनाडे नष्ट झाले आहेत. आधुनिक काँक्रीट इमारतींमध्ये चिमण्यांना घरटी बांधण्यासाठी जागा मिळत नाही.

**अन्नाची कमतरता:** कीटकनाशके, स्वच्छतेच्या नावाखाली झाडांचा नाश आणि शहरी कचऱ्याचे व्यवस्थापन यामुळे चिमण्यांचे मुख्य अन्न - लहान कीटक आणि बिया - दुर्मीळ झाले आहेत.

**वायू प्रदूषणा:** (कार्बन मोनॉक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड) आणि ध्वनिप्रदूषण यांचा चिमण्यांच्या श्वसनसंस्थेवर आणि प्रजननक्षमतेवर परिणाम होतो. मोबाईल टॉवर्समधून निघणारे इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन त्यांच्या दिशादर्शन क्षमतेवर आणि अंडी घालण्याच्या प्रक्रियेवर विपरीत परिणाम करते, असे अभ्यास सांगतात.

**स्पर्धा:** मैना, कबूतर आणि इतर आक्रमक प्रजातींमुळे चिमण्यांना अन्न आणि निवासस्थानांसाठी तीव्र स्पर्धेला सामोरे जावे लागते.

**हवामान बदल:** तापमानातील चढ-उतार आणि अनियमित पाऊस यामुळे कीटकांचे जीवनचक्र बिघडले आहे, ज्याचा परिणाम चिमण्यांच्या अन्नसाखळीवर होतो.

**नागरिकांनी करावयाचे उपाय:** चिमण्यांचे संरक्षण ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नाही, तर नागरिकांचाही यात सक्रिय सहभाग आवश्यक आहे. खालील उपाय प्रत्येक व्यक्ती आपल्या स्तरावर करू शकते

**कृत्रिम घरटी लावणे:** लाकडी किंवा मातीची घरटी (Nest Boxes) घराच्या गच्चीवर, अंगणात किंवा खिडकीजवळ लावावीत. एका प्रयोगात असे दिसून आले की अशा घरट्यांमुळे चिमण्यांची प्रजनन यशस्विता २०% वाढते. हे घरटे स्वस्त आणि सहज उपलब्ध आहेत.

**झाडे लावणे आणि जपणे:** स्थानिक प्रजातींची झाडे (उदा. वड, पिंपळ, निंब) लावून कीटकांचे प्रमाण वाढवावे. झुडपे आणि गवत कापू नये, कारण तिथे चिमण्यांचे अन्न सापडते.

**अन्न-पाण्याची सोय:** घराच्या परिसरात तांदूळ, बाजरी किंवा ज्वारीचे दाणे आणि स्वच्छ पाण्याचा भांडे ठेवावे. हे चिमण्यांना आधार देते,

**विशेषत**: उन्हाळ्यात.प्रदूषण कमी करणे: वाहनांचा वापर मर्यादित करणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यामुळे प्रदूषण नियंत्रणात मदत होईल. स्थानिक पातळीवर मोबाईल टॉवर्सच्या नियमनासाठी जागरूकता वाढवावी.

**जागरूकता पसरवणे:** शाळा, महाविद्यालये आणि सोसायट्यांमध्ये चिमणी संरक्षणाविषयी चर्चासत्रे आयोजित करावीत. स्पॅरो कॉउंट सारख्या नागरी संशोधन उपक्रमांत सहभागी होऊन चिमण्यांच्या संख्येचा डेटा गोळा करावा.

**जागतिक चिमणी दिवसाचे उद्दिष्ट :** हा दिवस पर्यावरणाच्या आरोग्याचे संकेत देणाऱ्या चिमणीला वाचवण्याचा वैज्ञानिक प्रयत्न आहे. चिमणी किन्स्टोन स्पीशीज नसली, तरी तिची उपस्थिती आपल्या परिसंस्थेचे संतुलन दर्शवते. हा दिवस शाश्वत विकास आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी कृती करण्याची प्रेरणा देतो.

**निष्कर्ष :** चिमणी छोटी असली, तरी तिचे जैवविविधतेतील योगदान आणि पर्यावरणीय महत्त्व अफाट आहे. जागतिक चिमणी दिवस आपल्याला निसर्गाशी पुन्हा जोडण्याची संधी देतो. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, चिमण्यांचे संरक्षण हे संपूर्ण परिसंस्थेचे रक्षण आहे. नागरिकांनी एकत्र येऊन या छोट्या सहवासिनीला वाचवले पाहिजे, जेणेकरून पुढील पिढ्याही त्यांच्या चिवचिवाटाचा आनंद घेऊ शकेल.

# सायकल सफरनामा : वर्धा ते शेवगाव



**अमोल श्रीरंग मुनेश्वर**
सदस्य बहार नेचर फाउंडेशन, वर्धा

सायकल हे शून्य कार्बन उत्सर्जक व आरोग्यदायी वाहन असल्यामुळे त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी, नागरिकांनी तसेच जमेल त्या सर्वांनी आपल्या दैनंदिन कामासाठी केला पाहिजे, हा संदेश देण्यासाठी बहार नेचर फाउंडेशन, वर्धाचे संस्थापक अध्यक्ष श्री. किशोर वानखडे, संस्थापक सचिव श्री. दिलीप विरखडे, सदस्य अधिवक्ता (ॲड.)श्री. प्रसाद सोईतकर व श्री. अमोल मुनेश्वर यांनी सायकलने शेवगाव जि. अहिल्यानगर येथील ३७व्या पक्षीमित्र संमेलनास जाण्याचा निश्चय केला. मारोतीबाबा समाधी स्थळ, पाण्याच्या टाकीजवळ, वर्धा येथून सायकल सफरीस दि.२८ जाने. २०२५ रोजी सकाळी सातला प्रवासास सुरुवात झाली. आदल्या दिवशी दि.२७ जानेवारीला श्री. संजय इंगळे तिगावकर यांनी सदिच्छा भेट देऊन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. दि. २८ला सकाळी निरोप देण्यासाठी सर्वश्री. अतुल शर्मा, दीपक गुढेकर, जयंत सबाणे, दर्शन दुधाने, देवर्षी बोबडे, प्राजक्ता विरखडे आणि विनोद सामक उपस्थित राहिले.

'रानी जाता, पक्षी निरिक्षता, नको मनी प्रदूषण सल ।
निसर्ग भेटी वाहन नेऊ, आरोग्यदायीनी सायकल ।।'–
(प्रा. किशोर वानखडे)

याप्रमाणे निसर्ग, पर्यावरण व एकूणच जैवविविधतेच्या 'संरक्षण व संवर्धन'प्रती कायम सजग राहण्याचा वसा बहार नेचर फाउंडेशन, सातत्याने जपत आहे. प्रचंड ऊर्जावान, कायम सकारात्मक, दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन असणारे बहारचे संस्थापक अध्यक्ष किशोर वानखडे आणि तितक्याच ताकदीने त्यांची साथ देणारे निसर्ग भ्रमंतीचे कीडे डोक्यात घेऊन अख्खा महाराष्ट्र पालथा घालणारे बहारचे संस्थापक सचिव दिलीप विरखडे यांनी पक्षीमित्र संमेलनास सायकलने किंवा पायी जावून उपस्थित राहण्याचा एक निराळाच पायंडा घालून दिला आहे. ३७ व्या पक्षीमित्र संमेलनापूर्वीच्या काही संमेलनांस सायकलने उपस्थित राहण्याकरिता पक्षीमित्रांना, निसर्गप्रेमींना प्रेरित करण्याचे कामही त्यांनी केले. यामुळे, सायकलने पक्षीमित्र संमेलनास जाण्याचा वसा कायम ठेवता आला.

बहार नेचर फाउंडेशन तर्फे सायकलने करण्यात आलेल्या काही सायकलवाऱ्या आणि सहभागी सायकलस्वार पुढील प्रमाणे–

(१) १८वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन २०१९, यवतमाळ– किशोर वानखडे व अंकित जयस्वाल

(२) ३२वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन २०१९, कराड– किशोर वानखडे व दिलीप विरखडे

(३) ३३वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन २०२० रेवदंडा, अलिबाग– किशोर वानखडे, दिलीप विरखडे, दिपक गुढेकर व दर्शन दुधाने

(४) ३४वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन २०२२ सोलापूर– किशोर वानखडे, दिलीप विरखडे, दीपक गुढेकर, देवर्षी बोबडे आणि लातूरवरून हेमंत धानोरकर व धनंजय गुट्टे

(५) ३५वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन २०२३ चंद्रपूर, पायी– किशोर वानखडे (वर्धा ते चंद्रपूर), पराग दांडगे (हिंगणघाट ते वरोरा), बंडू लालसरे (वरोरा ते चंद्रपूर) व अमोल मुनेश्वर (तडाली, टी–पॉइंटते चंद्रपूर);सायकलने–दिलीप विरखडे व जे. पी. शेट्टी, ठाणे

(६) ३६वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन २०२४ सांगली– किशोर वानखडे व विनोद सामक आणि आंबेजोगाईवरून हेमंत धानोरकर

सायकल सफरनामा दिवस पहिला मंगळवारदि.२८ जाने. २०१९, पहिल्या दिवशी सायकलच्या प्रवासाची सुरुवात मारोती बाबा समाधी स्थळ, पाण्याची टाकी, वर्धा येथून करण्यात आली. पुलगाव येथे अल्पोपहाराकरिता दिलीपसरांचे मित्र श्री. संजय ओरके यांच्याकडे थांबलो. त्यांच्याकडील काळ्या गुळाच्या चहाने पुढील प्रवासाकरिता तरतरी भरली. पहिल्या दिवशी सर्वात जास्त अंतर पूर्ण करण्यात आले. चढाईच्या रस्त्याने तर पार दमवून टाकले. पहिल्या दिवसाचा, वर्ध्यापासून सुरू केलेला प्रवास पुलगाव–देवगाव–सुलतानपूर–शिंगणापूर फाटामार्गे मार्गक्रमण करीत (जवळपास १३४ किलोमीटर पूर्ण करून) कारंजा (लाड) येथील मुक्कामाच्या ठिकाणी येऊन विश्रांतीकरिता हॉटेल 'नारायण इन'येथे थांबला.

सायकल सफरनामा दिवस दुसरा बुधवार दि.२९ जाने. दुसऱ्या दिवशी सायकलच्या प्रवासाची सुरुवात कारंजा (लाड) येथून करण्यात आली. अल्पोपहाराकरिता शेलु बाजार येथे थांबलो. यावेळी किशोर सरांचे परिचित श्री. राजू डांगे व मित्रपरिवार यांची भेट झाली. त्यांच्या शुभेच्छांसह पुढील प्रवासास अग्रेसर झालो. किन्ही राजा येथील फेमस पेढा खाण्याचा मोह आमच्यापैकी फक्त प्रसाद सोईतकर सरांना टाळता आला. अजूनही तेथील मधुर पेढ्याची चव जिभेवर रेंगाळत असल्याचा भास होतो. दुसऱ्या दिवशी चढाईचे रस्ते, ऊन आणि विरुद्ध दिशेचा वारा(हेड विंड),या तीन घटकांनी आमच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेचा कस पणाला लागला. गावरान भाषेत सांगायचं झाल्यास–

मांड्या आणि पोटऱ्या पार टाईट। बैरी वातावरणाशी आमची फाईट।।

दुसऱ्या दिवशीचा कारंजा (लाड) येथून सुरू केलेला प्रवास शेलुबाजार-किन्हीराजा-डोंगरकिन्ही-केवाद-पिंपरी सरहद-डोणगाव-अंजनी, बुद्रुकमार्गे मार्गक्रमण करीत (जवळपास १०१ किलोमीटर पूर्ण करून) मेहकर येथील मुक्कामाच्या ठिकाणी येऊन विश्रांतीकरिता हॉटेल परिवारयेथे थांबला.

सायकल सफरनामा दिवस तिसरा गुरुवारदि. ३० जाने. तिसऱ्या दिवशी सायकलप्रवासाची सुरुवात मेहकर येथून करण्यात आली. मेहकर येथून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या कंचनीमहाल या ऐतिहासिक वास्तूस भेट दिली. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकरच्या ऐतिहासिक वारशात भर घालणारी वास्तु म्हणजे कंचनीचा महाल. गूढ आख्यायिका, मनोरंजक कथा आणि अफवांचे पेव यामुळे या वास्तुबद्दल सुरुवातीपासूनच कुतुहल राहिले आहे.

मराठीचे प्रसिद्ध कवी मेहकरचे ना.घ. देशपांडे लिखित 'कंचनीचा महाल' या चार दीर्घ कवितांचा संग्रह प्रसिद्ध असून, तो १९८० नंतरच्या काही काळात खूपच गाजला होता. कविता संग्रहात कंचनीच्या रुपाचे वर्णन करणाऱ्या काही ओळी-

अशीच होती रे निःशब्द मधुर ती रात्र राजसवाणी ।
असेच  खोलात वाहत होते रे या पैनगंगेचे पाणी ।सोसून गारठा
चंचळ जळांच्या रुपेरी लाटांत न्हाले ।

कंचनी महाल संरक्षित वास्तू व्हावी अशी मागणी इतिहासप्रेमींची असूनही, पुरातत्व विभागाकडून याची दखल घेण्यात आलेली नाही. शासनाचेही याकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसून येते, ही फारच दुर्दैवी व क्लेशदायक बाब आहे. पुढे, प्रवासात अग्रेसर होत सिंदखेडराजा या ऐतिहासिक स्थळी भेट देण्यात आली. हे स्थळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई राजमाता जिजाबाई यांचे जन्मगाव आहे. त्यामुळे सिंदखेडराजाला एक आगळे ऐतिहासिक महत्त्व असल्याने, जन्मस्थळीच्या राजमाता जिजाऊ यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे दर्शन घेऊनच पुढील प्रवासास मार्गस्थ झालो.तिसऱ्या दिवशीचा मेहकर येथून सुरू केलेला प्रवास सुलतानपूर-बीबी-दुसरबीड-किनगावराजा-सिंदखेडराजा-न्हावा-धारकल्याणमार्गे पुढे जात (जवळपास १०५ किलोमीटर पूर्ण करून) जालना येथील मुक्कामाच्या ठिकाणी येऊन विश्रांती करिता हॉटेल अशोकायेथे थांबला.

सायकल सफरनामा दिवस चौथा शुक्रवार दि.३१ जाने. चौथ्या दिवशी सायकलच्या प्रवासाची सुरुवात अंबड चौफुली, जालना येथून करण्यात आली. अंबड येथे अल्पोपहाराकरिता थांबलो. या सायकलप्रवासामध्ये आम्हा सायकलस्वारांमध्ये सायकलविषयी चर्चा होत असे. त्यामध्ये सायकलच्या चक्क्यांमध्ये भराव्या लागणाऱ्या हवेबाबत चर्चा झाली. किशोरसरांच्या सायकलमध्ये ९६ पीएस्आय, प्रसादसरांच्या सायकलमध्ये ८० पीएसआय, दिलीपसरांच्या सायकलमध्ये ७६ पीएस्आय,आणि माझ्या सायकलमध्ये सर्वात कमी ५० पीएस्आयइतकी हवा भरली जायची. सायकलस्वारांमध्ये सर्वात पिछाडीवर मीच असायचो. त्यावर माझे बाबतीत प्रसादसरांनी एक डायलॉग उस्फूर्तपणे बनवला, प्रेशर कम है तो क्या हुआ, रायडर है मैं, रुकेगा नहीं साला. पाचोडपूर्वी एका चौफुलीच्या ठिकाणी आमचे चालते फिरते जीपीएस (किशोर सर) रस्ता भरकटले. परंतु, अवघ्या काही मिनिटातच ते योग्य मार्गावर आले. आणि मग, येथून पुढे पैठणकरिता मार्गस्थ झालो.पैठण येथे संत एकनाथ महाराजांच्या समाधी स्थळी भेट दिली व अन्नछत्रात प्रसादाचा लाभही घेतला. पैठण येथील नाथसागर या विस्तीर्ण जलाशयाची भेट डोळ्यांच्या कक्ष्यांमध्येही न सामावणारी व विलोभनीय ठरली. पैठणपासून शेवगावलगतपर्यंतचा जवळपास १५ किलोमीटरचा रस्ता, ऊसांच्या ट्रॅक्टरमुळे जागोजागी उखडलेला, खड्डे-गड्डे पडलेला एकपदरी रस्ता, जणूकाही सायकलिंग ॲडव्हेंचरसाठीच बनलेला आहे. अशा रस्त्यामध्ये अत्यंत शिताफीने आणि वेगवान पद्धतीने पुढे जाण्याची क्षमता केवळ सायकल या एकमेव प्रवासाच्या साधनातच आहे. या रस्त्याचा मनमुराद आनंद आम्ही सायकलस्वारांनी लुटला, हे प्रकर्षाने सांगावेसे वाटते. चौथ्या दिवशी जालना येथून सुरू केलेला प्रवास अंबड-पाचोड-पैठणमार्गे मार्गक्रमण करीत, जवळपास ११२ किलोमीटर पूर्ण करून, संमेलनस्थळी शेवगाव, जि. अहिल्यानगर येथे पूर्ण केला. अशा प्रकारे,  बहारींची सायकलवारी, पक्षीमित्र संमेलनाच्या दारी पोहोचली. सायकलस्वारांनी वर्धा-अमरावती-वाशिम-जालना-बुलढाणा-अहिल्यानगर, या सहा जिल्ह्यांच्या हद्दींमध्ये प्रवेश केला व या जिल्ह्यांतर्गत सायकलने जवळपास ४५५ किलोमीटर प्रवास करून, एक अनोखा सायकल सफरनामा आपले नावे नोंदवून घेतला. शेवगाव नजीक ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरवर लावलेल्या स्पीकरमध्ये वाजणारे १९७७ यावर्षी रिलीज झालेल्या 'अपनापन' या चित्रपटातील आनंद बक्षीलिखित, लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी स्वरबद्ध केलेले आणि मोहम्मद रफी व लता मंगेशकर यांच्या सुमधूर स्वरांनी सजलेले-

'आदमी मुसाफिर है, आता है, जाता है।
आते जाते रस्तें में यादें छोड जाता है ।'

हे गीत कानी पडले.या गीताप्रमाणे चार सायकलस्वारांच्या अंतःकरणात या सायकल सफरनाम्यातील अमीट आठवणी नक्कीच कोरल्या गेल्या आहेत, यात शंका नाही.

# करकोच्यांच्या वस्तीचे गाव



**सहा. प्रा. निखिल बोराडे**
पक्षीसंशोधक (गडचिरोली)
Email - nikhilborode94@gmail.com

एक नदी किनारी वसलेले गाव, गावात शतका पूर्वीची अनेक चिंचेची झाडे त्या झाडांवर हजारोच्या संख्येत असलेले कारकोच्यांची वस्ती आणि त्या सारखेच इतर प्रजातीचे पाणपक्षी, अतिशय संकल्पनात्मक अस दृश्य वाटतय ? हो हे दृश्य तितकच वास्तविक सुद्धा आहे. ही नदी आहे वैनगंगा गाव आहे गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यापासून सुमारे ५ कि. मी. अंतरावर असलेले वघाळा. अंदाजे ४५० लोकवस्तीचे गाव, गावात दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे गावाचे पुनर्वसन सुद्धा करण्यात आले. परंतु काही कुटुंब सध्याही गावात असलेली बघायला मिळतात.

या गावात सुमारे शतका पूर्वीची ४०-५० चिंचेची (Tamarindus indica) झाडे आहेत आणि याच झाडांवर दरवर्षी हजारोंच्या संख्येने उघड्या चोचीच्या करकोच्यांची (Asian Openbill) व गायबगळा, पाणकावळा, तीरंदाज या सारख्या पक्ष्यांची वस्ती बघायला मिळते. हे पक्षी या ठिकाणी मुख्यत्वे प्रजननाच्या हेतूने आलेली बघायला मिळतात.

दरवर्षी मे महिन्याच्या सुमारास यांचे आगमन या ठिकाणी सुरु होते. उघड्या चोचीच्या कारकोच्यांचा प्रजनन काळ हा भारतात जून ते सप्टेंबर समजला जातो. समान निरीक्षण या ठिकाणी सुद्धा बघितले जाते. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आगमन झाल्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात घरटे बांधणीला सुरवात होते. जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्या पर्यंत हे पक्षी अंडी घालतात व जुलै च्या दुसऱ्या आठवड्यात पिल्ले अंड्यांच्या बाहेर आलेली बघायला मिळतात. ऑगस्ट महिन्यात पिल्ले उडण्या लायक होतात व नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत हे सर्व पक्षी आपापल्या ठिकाणांवर परत जायला सुरवात करतात.

या अभ्यासात प्रामुख्याने लक्षात आलेली गोष्ट म्हणजे हे पक्षी फक्त प्रजनन करतेवेळीच या ठिकाणाचा वापर करतात, प्रजनन व पिल्लांची पूर्ण वाढ झाल्यावर परत निघून जातात. हे निरीक्षण मुखत्वे घोगल्याफोड्या करकोचाच्या संदर्भात बघण्यात आले.

इतक्या मोठ्या प्रमाणात या ठिकाणी पक्ष्यांची उपस्थिती बघून वनविभागाचे सुद्धा लक्ष याठिकाणी वेधले गेले व २०१२ साली या पक्ष्यांच्या संरक्षणासाठी वन्यजीव पक्षी संरक्षण समिती गठीत करण्यात आली. समितीच्या अध्यक्ष स्थानी गावातीलच एका व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. समितीच्या सचिव पदी वनविभागाचा एखादा कर्मचारी असतो व या संपूर्ण समितीच्या देखरेखेची जबाबदारी हि परिक्षेत्र वन अधिकार्याची (RFO) असते.

समिती गठीत झाल्यानंतर सर्वप्रथम समिती तर्फे ४१ झाडांना क्रमांक देऊन चिन्हित करण्यात आले. परंतु अभ्यासा दरम्यान एक बाब आणखी निदर्शनात आली कि या ४१ झाडांपैकी फक्त १२-१५ झाडे हे पक्षी त्यांच्या घरटे बांधणीसाठी व प्रजननासाठी उपयोग करतात. प्रत्येक झाडावर किमान १००-१२० पक्षी असे अंदाजे १५०० ते १७०० एकून पक्षी या काळात येथे आढळतात. हे दृश्य बघतांना जणू पक्ष्यांचे संमेलन आहे कि काय असा भास होतो. परंतु ४१ झाडांपैकी हे पक्षी १२-१५ झाडांचाच का बर उपयोग करत असतील या मागील कारण शोधणे मात्र अभ्यासाचा विषय आहे.काही काळ अगोदर या पक्ष्यांच्या शिकारींच्या सुद्धा काही नोंदी आहेत परंतु गावकर्त्यांच्या जागृकतेमुळे हि शिकार आज या ठिकाणी कायमची बंद झालेली आहे.

सुरवातीच्या काळात हे पक्षी प्रजनन झाल्यानंतर नोव्हेंबर च्या अखेरीस परत जायचे अशा पक्ष्यांना स्थानिक स्थलांतरित पक्षी म्हणून संबोधले जाते. परंतु अलीकडच्या काळात हे पक्षी मात्र वर्षभर याच ठिकाणच्या अवतीभोवती बघायला मिळतात. तर प्रश्न हा उपस्थित होतो कि या पक्ष्यांनी यांचे स्थलांतर थांबवले असेल का? हे पक्षी याच ठिकाणी स्थायिक झाले असतील का? की जे पक्षी वर्षभर या ठिकाणी बघायला मिळतात ते सुरवाती पासुनच या ठिकाणाचे स्थानिक पक्षी असावेत का? असे एक ना अनेक प्रश्न संशोधनाचा विषय आहेत. आणि अर्थात प्रजनन काळात या पक्ष्यांची असणारी संख्या आणि वर्षभर दिसत असणाऱ्या पक्ष्यांची संख्या यात फार तफावत आहे.

या ठिकाणाची भौगोलिक परिस्थिति व पक्ष्यांची जैवविविधता लक्षात घेता भविष्यात हे ठिकाण गडचिरोली जिल्ह्यातील संभाव्य पर्यटन स्थळ म्हणून स्थान मिळवु शकत परंतु सद्यस्थितीत हे ठिकाण वनविभागाकडून दुर्लक्षित आहे असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे आणि कधी कधी असे वाटते कि एका बाजूने पाहता हे ठिकाण मानवी हस्तक्षेपा पासून दूर आहे ते बरेच आहे. कारण हे ठिकाण पर्यटन स्थळ होणे हे जरी स्थानिक लोकांच्या दृष्टीने चांगले असले, रोजगाराची संधी निर्माण करणारे असले तरी दुसऱ्या बाजूने तेथील जैवविविधतेसाठी मात्र धोकादायकच आहे. कारण एकदा का या ठिकाणी मानवी हस्तक्षेप झाला कि मग प्रवेश करते ती म्हणजे मानवाची लोभी, हावरट आणि अधाशी अशी मानसिकता. मानवाला आता विचार करणे भाग आहे कि आपल्या या हावरटपणामुळे हा नैसर्गिक वारसा आजच संपवायचा कि येणाऱ्या पिढीसाठी शिल्लक ठेवायचा कारण मग येणाऱ्या पिढीला या परिस्थितीसाठी उत्तर देण्यासाठी सुद्धा आपल्यालाच तयार रहाव लागेल.

# अप्परवर्धा जलाशयावरील पक्षी वैभव



**सहा. प्रा. अश्विन लुंगे**
पक्षी-संशोधक, मोर्शी
Email - agl20class@gmail.com

महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुकास्थित अप्पर-वर्धा जलाशय एक महत्त्वाची पाणथळ परिसंस्था आहे. शासकीय दरबारी या जलाशयाची नळ-दमयंती सागर या नावाने नोंद आहे. हा जलाशय वर्धा नदीवर तयार करण्यात आलेला आहे. वर्धा नदी ही गोदावरी नदीची महत्त्वाची उपनदी असून महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण नदी आहे. ती मुख्यतः विदर्भातून वाहते. वर्धा नदी मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वताच्या दक्षिणेकडील भागातून उगम पावते आणि महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातून वाहत जाते. वर्धा नदीची लांबी ४०० किलोमीटरच्या आसपास आहे. पुढे वर्धा नदीचा संगम वैनगंगा नदी सोबत होतो आणि त्या नदीला प्राणहिता नदी म्हणतात. ही प्राणहिता नदी शेवटी गोदावरी नदीला जाऊन मिळते.

दमयंती, माडू या नद्या अप्पर-वर्धा जलाशयामध्ये विलीन होतात. जलाशयाचा मुख्य उद्देश सिंचनासाठी पाणी पुरवठा करणे असा आहे. हा जलाशय शहरांतील आणि ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी आणि औद्योगिक कारणासाठी देखील वापरला जातो. पावसाळ्यात वर्धा नदीत येणाऱ्या जास्त पाण्यामुळे येणाऱ्या पुराचे नियंत्रण करण्यासाठी जलाशय महत्त्वाचा ठरतो. त्यामध्ये साठवलेले पाणी दुष्काळ पडल्यास वापरता येते. जलाशयातील पाणी वापरून विद्युत निर्मिती देखील केली जाते. मात्र, त्याचा प्राथमिक उद्देश सिंचन आणि पाणी संचय असाच आहे. या जलाशयाचे पाणलोट क्षेत्र खूप मोठे असून अनेक हिवाळी स्थलांतरित पक्षी या भागामध्ये उत्तरेतील थंडीपासून बचाव करण्यासाठी व अन्न मिळविण्यासाठी येतात, आणि उन्हाळी स्थलांतरित पक्षी या भागात प्रजननासाठी येतात. काही स्थलांतरित पक्षी दक्षिणेकडे जाताना या जलाशयाचा स्टॉप ओव्हरसाईट म्हणून वापर करतात. हा जलाशय केवळ स्थानिक पक्ष्यांसाठीच नाही, तर स्थलांतरित पक्ष्यांसाठी देखील महत्त्वाची पाणथळ आहे. हा जलाशय विशेषतःपक्ष्यांकरिता अन्न, प्रजनन, आणि निवासासाठी एक उत्तम परिसंस्था असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. हिवाळ्यामध्ये हजारो किलोमीटरचे अंतर पार करून उत्तर गोलार्धातील विविध देशांमधील स्थलांतरित पक्षी, दक्षिण गोलार्धाकडे जात असताना सेंट्रल एशियनफ्लाय-वे, इस्ट एशियन ऑस्ट्रेलियन फ्लाय-वे, एशियन इस्ट आफ्रिकन फ्लाय-वे, या तीन हवाई मार्गाने भारतामध्ये दाखल होतात आणि विसावतात. जैवविविधतेने परिपूर्ण असलेल्या पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अशा अप्पर-वर्धा जलाशयावर दरवर्षी हिवाळ्यामध्ये विविध प्रजातीचे पक्षी मोठ्या संख्येने स्थलांतर करून येतात. यामध्ये बहुतांश पाणपक्षी असतात त्यातही बदक व हंस प्रवर्गातील पक्ष्यांचे प्रमाण अधिक असते. उत्तरेकडील भागांमध्ये कडाक्याची थंडी असल्यामुळे थंडीपासून बचाव करण्यासाठी स्थलांतरित पक्षी युरोप, आशिया, सायबेरिया, कझाकिस्तान, मंगोलिया आणि रशिया या भागातून स्थलांतर करून अप्पर-वर्धा जलाशयावर येतात. यामध्ये नॉर्दनशॉव्हेलर (थापट्या बदक), युरेशिअन स्पूनबिल (चमचा), नॉर्दनपिंटेल (तलवारबदक), रूडी (ब्राह्मणी) शेल्डक (चक्रवाक), युरेशियन कूट ( वारकरी), कॉमनटिल (चक्रांगबदक), गडवाल (मलिनबदक), गार्गनी (भुवईबदक), युरेशियन व्हिजन (तरंगबदक), रेड-क्रेस्टेडपोचर्ड (मोठी लालसरी), इत्यादी बदक प्रजातीचे पक्षी स्थलांतर करून येतात. हंस प्रजातींमध्ये बार-हेडेडगूज (राजहंस, पट्टकदंब), ग्रेलॅगगूज (कलहंस), व्हाईट-फ्रंटेडगूज (पांढऱ्या माथ्याचा कलहंस), आदी स्थलांतर करून येतात. हे सर्व स्थलांतरित पक्षी या भागामध्ये अन्न मिळविण्यासाठी येतात. राजहंस तथा पट्टकदंब (बार-हेडेडगूज) यांच्या समूहात अगदी दुर्मिळ असा एक पांढऱ्या माथ्याचा मोठा कलहंस (ग्रेटरव्हाईट-फ्रण्टेडगुज) यापक्ष्याची नोंद प्रथमच या भागात घेण्यात आली. हा पक्षी धुसर रंगाचा असून त्याच्या माथ्यावर ठळकपणे दिसणारा पांढरा मोठा पट्टा असतो आणि चोच व पाय पूर्णपणे गुलाबी असतात. आकाराने मात्र तो राजहंस या पक्ष्याइतकाच असतो आणि राजहंस अथवा इतर स्थलांतरित बदक यांच्या समूहात राहतो. हा पक्षी आपल्या भागाकरिता हिवाळी पाहुणा असून जवळपास ६,०००किलोमीटरचा प्रवास करीत मध्य आशिया स्थलांतरित हवाई मार्गाने भारतीय उपखंडात येतो. मात्र, मध्य भारतात तो क्वचितच आढळतो. तसेच या भागासाठी अतिशय दुर्मिळ असलेल्या (इंडियन स्किमर) पाणचिऱ्याची सुद्धा नोंद या भागात घेण्यात आली आहे. तसेच या जलाशयावर छोटा आर्ली (स्मॉल प्रॅटिनकोल), प्राच्यआर्ली (ओरिएण्टल प्रॅटिनकोल), नदीसुरय (रिव्हर टर्न), पाणकावळा प्रजाती, तिरंदाज (ओरिएण्टल डार्टर), निळ्या शेपटीचा राघू (ब्ल्यू-टेल्ड बी-ईटर), शेकाट्या (ब्लॅक-विंग्ड स्टिल्ट), पाणकोंबडी प्रजाती, केंटीश चिखल्या(केंटीश प्लॉव्हर), टिटवी प्रजाती, इत्यादी पक्ष्यांची वीण होते. अप्पर-वर्धा जलाशयावर छोटाआर्लीया पक्ष्याची संख्या जवळपास

१,८०० व प्राच्य आर्ली या पक्ष्याची जवळपास ३००;एवढ्या मोठ्या संख्येची या भागामध्ये प्रथमच नोंद घेण्यात आली. हे पक्षी पाच ते सहा हजार किलोमीटरचा प्रवास करूनआपल्या भागामध्ये दाखल होतात. त्याच प्रमाणे काहीपक्षी-प्रजाती उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच विणीसाठी भारतात दाखल होतात. यामध्ये छोटा आर्ली व प्राच्य आर्ली हे पक्षी ऑस्ट्रेलियातून मध्य भारतामध्ये दाखल होतात. विशेष म्हणजे ते पूर्व आशियाई ऑस्ट्रेलियन फ्लाय-वे या मार्गाने स्थलांतर करतात आणि जवळपास चार महिन्यांचा मुक्काम ते या भागामध्ये करतात. अप्पर-वर्धा जलाशयावर फेब्रुवारी ते मे दरम्यान या पक्ष्यांची मोठ्या प्रमाणावर जमिनीवर वीण होते. छोटा आर्ली व प्राच्य आर्ली हे प्रँटिकोल वर्गातील ग्लेरिओलिडे कुळातील पक्षी आहेत. छोटा आर्ली भारत, पाकिस्तान, नेपाळ, आणि श्रीलंका या प्रदेशात आढळतो. छोटा आर्ली हा समूहाने राहतो. त्यांचा निवास, नद्या आणि दलदलीचे प्रदेश या ठिकाणी असतो. हा पक्षी आकाराने चिमणी एवढा असतो. पाकोळीसारखे टोकदार पंख आणि बाणाच्या आकाराची शेपटी असते. हा पक्षी जमिनीवरच घरटे बनवितो व घरट्यात एकावेळी दोन ते तीन अंडी घालतो. तसेच,प्राच्य आर्ली या पक्ष्याची वीण याच भागामध्ये होते. यापक्ष्याची सरासरी लांबी २३ ते २४ सेंटीमीटर असते. शरीराच्या तुलनेत याचे पाय आकाराने लहान असतात, पंखलांब व टोकदारअसतात,पंखांचा रंग गव्हाळ असून टोकावर काळी झालर असते. या पक्ष्याची चोच लहान आकाराची असून ती टोकावर काळ्या रंगाची आणि वरील भागात चटक लालसर शेंद्री रंगाची असते. हा पाणपक्षी साधारणतःजमिनीवर कीटकांची शिकार करतो. परंतु, याची चोच वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे हा पक्षी हवेत उडताना किटकांची शिकार करतो. या पक्ष्याचे प्रमुख खाद्यकिडे, कृमी, गांडूळ, कोळी हेआहेत.नर व मादी दिसायला सारखे असतात.आपल्या भागाकरिता हा उन्हाळी स्थलांतरित पक्षीअसून गवताळ भाग, दलदलीचा परिसर, पाणथळ हे याचे वास्तव्य (हा याचा अधिवास) आहे. हे पक्षी जमिनीवरच घरटे बनवितात.त्यांचे घरटे टिटवीच्या घरट्यासारखे असते. घरट्यात एकावेळी दोन ते तीन अंडी घालतात. अंड्यांमधून पिल्ले निघाल्यावर काही दिवसाच्या कालावधीनंतर ते पुन्हा परतीचा प्रवास सुरू करतात. या भागासाठी दुर्मिळ,'पॅसिफिक गोल्डन प्लोव्हर (सोनचिखल्या)', यापक्ष्याची अप्पर-वर्धा जलाशयावर प्रथमच नोंद घेण्यात आली. हा पक्षी सातपुडा पर्वतरांगेनंतर दक्षिण भारतात जात असताना महत्त्वाचा थांबा म्हणून या जलाशयाचा वापर करतो. सोनचिखल्या या पक्ष्याची उत्तर युरोपमध्ये वीण होते. चार हजार किलोमीटरचा प्रवास करून तो दरवर्षी आपल्या भागामध्ये दाखल होतो. सामान्यतःहा पक्षी पाणथळ व दलदलीच्या ठिकाणी आढळतो. हा पक्षी पाण्यातील किडे, कृमी, गांडूळ व कोळीखातो. या पक्षांच्या पंखांना सोनेरी छटा असतात. हा पक्षी वरून उदी रंगाचा असतो, त्यावर सोनेरी व पिवळ्या रंगाचे ठिपके आणि छातीवर बदामी करडा रंग असतो. हा अतिशय दुर्मिळ असून सहजपणे आपल्या भागामध्ये आढळत नाही.तसेच चिखल्या पक्ष्यांमध्ये, कंठेरी चिखल्या, काळयाशेपटीचा पाणटीवळा (वेस्टर्न ब्लॅक-टेल्ड गॉडविट), सामान्य टीलवा (कॉमन रेडशँक),सामान्य हिरवा टीलवा (कॉमन ग्रीनशँक), ठिपकेवाली तुतारी (वुड सॅण्डपायपर), हिरवी तुतारी (ग्रीन सॅण्डपायपर), सामान्य तुतारी (कॉमन सॅण्डपायपर), चिखली तुतारी (मार्श सॅण्डपायपर), भांडखोर पाणलावा (रुफ), नदीसुरय, कल्लेदारसुरय (व्हिस्कर्ड टर्न), काळ्या डोक्याचा कुरव (कॉमन ब्लॅक-हेडेड गल), तपकिरी डोक्याचा कुरव (ब्राऊन-हेडेड गल), पल्लासचा कुरव (ग्रेट ब्लॅक-हेडेड (पलास्ज) गल),असे अनेक पक्षी हिवाळ्यात स्थलांतर करूनअप्पर-वर्धा जलाशयावरील भागात काही महिने मुक्कामी असतात. निळ्या शेपटीचा राघू हा एक सुंदर पक्षी आहे जो मुख्यतःआशिया आणि आफ्रिकेमधील उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये आढळतो. हा पक्षी साधारणतः२५ ते २७ सेंटीमीटर लांबीचा असतो. त्याचे शरीर हिरवट



**१.पांढऱ्या माथ्याचा कलहंस**
**(ग्रेटर व्हाईट-फ्रण्टेड गुज)**



**२. कलहंस**
**( ग्रेलॅग गुज )**



**३. सोनचिखल्या**
**(पॅसिफिक गोल्डन प्लोव्हर )**

रंगाचे असून पंखांची शेवटची बाजू निळ्या रंगाची असते, ज्यामुळे त्याला'ब्लू-टेल्ड'असे नाव मिळाले आहे.त्याच्या डोक्यावर आणि गळ्यावर सुंदर रंग असतो, जो त्याला आकर्षक बनवतो. हा पक्षी मुख्यतःमधमाश्या, आणि इतर छोटे कीटक खातो. तो हवेत उडत असताना आपली शिकार पकडतो. हे पक्षी अप्पर-वर्धा जलाशयावर मार्च ते एप्रिल दरम्यान प्रजननासाठी येतात. याचे घरटे सामान्यतः नदीच्या किनाऱ्यावर कपारींमध्ये १-२ मीटरपर्यंत खोलवर असते. या पक्ष्यांची ३५०-४०० एवढ्या संख्येमध्ये या भागात नोंद घेण्यात आली आहे. मादी ४ ते ५ अंडी घालते आणि दोन्ही नर-मादी अंडी उबविण्याचे काम करतात.या पक्ष्यांच्या एकूण १४०० घरट्यांची नोंद या भागात घेण्यात आली आहे. पिल्ले मोठी झाल्यावर ऑगस्ट महिन्याच्या शेवटी हे पक्षी परतीच्या प्रवासाला निघतात. त्यांच्या रंगाने आणि उडण्याच्या कौशल्याने निळ्या शेपटीचा राघू निसर्गप्रेमींना आणि पक्षी निरीक्षकांना आकर्षित करणारा पक्षी आहे, अप्पर-वर्धा जलाशय परिसर हा विविध पक्ष्यांच्या प्रजनन आणि अन्न मिळविण्यासाठी महत्त्वाचा आहे. या जलाशयात पाण-वनस्पतींच्या विविध प्रजाती आढळून येतात. शेवाळे, पानवेली आणि अनेक सूक्ष्म जीव जंतू, कृमी,किडे, शंख, शिंपले, मासे, उभयचर प्राणी, सरपटणारे प्राणी या भागामध्ये आढळतात. विविध प्रजातींचे मासे, कीटक आणि इतर जलचर प्राणीही आढळतात.त्यामुळे हा जलाशय, स्थानिक तसेच स्थलांतरित पक्ष्यांसाठी एक उत्तम आहार स्रोत आहे. आय.यु.सी.एन. रेडलिस्टमध्ये समाविष्ट असलेल्या असुरक्षित व धोकाग्रस्त अशा एकूण १० पक्षी-प्रजातींची नोंदसुद्धा या जलाशयावर घेण्यात आली आहे. यामध्ये छोटी लालसरी (कॉमन पोचार्ड)(तण), नयनसरी बदक (फेरुजिनस (व्हाईट आईड) पोचार्ड), काळया शेपटीचा पाणटीवळा , बाकचोचतुतारी (कर्ल्यू सॅण्डपायपर)(NT), नदीसुरय (तण), पाणचिरा (तण), तिरंदाज (NT), काळया डोक्याचा शराटी (ब्लॅक हेडेड (व्हाईट) आयबिस) (NT), रंगीत करकोचा (पेण्टेड स्टॉर्क) (NT), पांढऱ्या मानेचा करकोचा (वूली-नेक्ड स्टॉर्क)(तण) इत्यादी. याभागामध्ये मी गेल्या तीन वर्षांपासून प्रा. डॉ. गजानन वाघ, प्राध्यापक तथा वरिष्ठ पक्षी-अभ्यासक यांच्य ामार्गदर्शनाखाली पक्षी-संशोधन करीत आहे. या भागामध्ये आम्ही जवळपास १८० च्यावर पक्षी-प्रजातींच्या नोंदी घेतल्या आहे. त्यासंदर्भात शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाला आहे. अप्पर-वर्धा जलाशय हा स्थलांतरित व स्थानिक पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाची पाणथळ परिसंस्था आहे. या जलाशयामुळे निसर्ग आणि पर्यावरणाचा समतोल राखला जातो. जलाशयातील जलस्तराचे नियंत्रण, पाणी साठवण, आणि जैवविविधता यामुळे हा परिसर स्थानिक आणि स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्त्वाचेठिकाणआहे. 'अप्पर-वर्धा जलाशय हा स्थलांतरित व स्थानिकपाण-पक्ष्यांकरिताअन्न व प्रजननाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा अधिवास आहे आणि अमरावती जिल्ह्याच्या पक्षी वैभवात भर घालणारी बाब आहे. परंतु, गाळपेराचे वाढते प्रमाण, भटके कुत्रे, गुरांचावावर, मासेमारीकरिता वापरले जाणारे नायलॉन जाळे, रासायनिक शेतीचे वाढते प्रमाण,असे अनेक प्रकारचे धोके या पक्ष्यांच्या प्रजननाच्या दृष्टीने आढळून आलेले आहे. पक्ष्यांच्या व त्यांच्या अधिवासाच्या संवर्धनाच्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

*****

# स्वागत नवीन सभासदांचे

**(दिनांक ०१ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ )**

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १६२१ | अकोला | श्री. अजित बरनाबास गोडाई | 9822368998 | ajitgoodai@gmail.com |
| १६२२ | अकोला | श्री. अनुल विजय मनवार | 9822564066 | anul.manwar@gmail.com |
| १६२३ | अंबरनाथ | श्री. सुहास प्रभाकर गुप्ते | 9819411491 | guptesuhas7@gmail.com |
| १६२४ | धाराशिव | डॉ. माधव वासुदेव कुलकर्णी | 9421342428 | |
| १६२५ | ठाणे | श्री. अमित अनंत पेंडूरकर | 9819708674 | amit.pendurkar@reddiffmail.com |
| १६२६ | नाशिक | सौ. पुर्वा संतोष देशपांडे | 9890681148 | purvagandha@gmail.com |
| १६२७ | नाशिक | सौ. रोहिणी राजीव जोगळेकर | 9623982820 | purvagandha@gmail.com |
| १६२८ | वाशिम | श्री. पुरूषोत्तम बाबुराव इंगळे | 8983793774 | puruingle5@gmail.com |
| १६२९ | पुणे | डॉ. अक्षय चौधरी | 8793401012 | achoudhry29@gmail.com |

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १६३० | अहिल्यानगर | सचिन रेवन्नाथ साळुंके | 7040294084 | sachinsalunkeofficial@gmail.com |
| १६३१ | मुंबई | श्री. केदार गिरीष गोरे | 9820231239 | gore.kedar@gmail.com |
| १६३२ | बुलढाणा | कु. समिक्षा राजु शिंगाडे | 8080844116 | Samikshashingade29@gmail.com |
| १६३३ | पुणे | श्री. अविनाश उमाकांत फाटक | 7057188998 | avinapune@gmail.com |
| १६३४ | नागपूर | श्री. अजय जगदिश पंढरीपांडे | 8421833135 | ajayash.pande@gmail.com |
| १६३५ | अकोला | श्री. हेमंतकुमार नंदकुमार शाह | 9422937771 | hemantshah1961@gmail.com |
| १६३६ | परभणी | डॉ. संतोष वसंतराव रनखांब | 9404241492 | santosh.rankhamb@gmail.com |
| १६३७ | अमरावती | श्री. सर्वेश मनिषा विनोद मराठे | 9021909555 | sarvesh4marathe555@gmail.com |
| १६३८ | अहिल्यानगर | ज्योती रावसाहेब ढाकणे | 8308375979 | jyotidhakne22@gmail.com |

# तापी नदीतील रिव्हर लॅपविंगची सद्यस्थिती आणि माझा अनुभव !



**प्रतीक सु. चौधरी**
पक्षी–संशोधक
Email - pratik.chaudhary15@yahoo.in

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा जैवविविधतेने नटलेला अधिवास मी गेल्या तीन वर्षांपासून मेलघाट लँडस्केप मधील तापी नदी आणि तिच्या उपनद्यां वर आढळणाऱ्या रिव्हर लॅपविंग (नदी टिटवी) या पक्ष्याच्या सध्यस्थिती वर संशोधन करत आहे. माझे हे संशोधन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती च्या प्राणिशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गजानन वाघ यांच्या मार्गदर्शना खाली सुरू आहे. माझ्या अभ्यासाचा मुख्य उद्देश रिव्हर लॅपविंगचा अधिवास, सध्यास्थिती, विस्तार आणि प्रजनन तसेस त्यांना असलेले धोके यावर सखोल संशोधन अभ्यास करणे हा आहे. या सर्वेक्षणामध्ये उल्लेखनीय बाब म्हणजे तापी नदी हि नदी टिटवी या पक्ष्यासाठी साठी अत्यंत महत्त्वाचा अधिवास आहे. या प्रजातीचा विस्तार फक्त मेळघाटातील तापी नदी पुरताच मर्यादित आहे. तापी नदी एक मोठी आणि वाहणारी नदी आहे जी पक्ष्यांसाठी जीवन वाहिनी ठरत आहे.


विदर्भ म्हटलं की प्रचंड आणि प्रखर उन्हाळा आणि अशाच उन्हाळ्याच्या प्रचंड उन्हात मेळघाट या ठिकाणी आपले संशोधन क्षेत्र आहे म्हटल्यावर नंतर आपल्याला कशाचाही विचार न करता आपल्या संशोधन स्थळी पोहोचणे आणि कार्यभार हाती घेणे याशिवाय पर्याय नसतो परंतु हे सगळं करत असताना एक आत्मिक समाधान आपल्या वाट्याला येत असते आणि त्याचे नाव म्हणजे संशोधन....

२०२२ आणि २०२३ मध्ये मी मेलघाट मधील तापी नदी आणि तिच्या उपनद्यां – खापरा, सिपना आणि गडगा – यांवर विस्तृत सर्वेक्षण केले. विशेषतः राजा किल्ला कॅम्प, मोहनबल्ला कॅम्प, आणि रंगुबेली कॅम्प या ठिकाणी मी रिव्हर लॅपविंग च्या वितरणाचा अभ्यास केला. या कॅम्प मधील काम अत्यंत आव्हानात्मक होते, कारण हे भाग उग्रभूप्रदेश आणि घनदाट जंगलांनी वेढलेले आहेत. तरीही, नद्यांच्या किनाऱ्यांवर आणि वाळूच्या बेटांवर रिव्हर लॅपविंगचा अधिवास नेमका कुठे आहे, याचा बारकाईने अभ्यास करत राहिलो. संशोधन करत असताना बऱ्याच गोष्टीचा अनुभव हा वेळेनुसार कार्यक्षेत्रानुसार हा येतोच असतो परंतु या वेळेला आलेल्या अत्यंत सुखदायक अनुभव म्हणजे गेल्या एका वर्षापासून वाट पाहत आलेल्या स्वप्नाची स्वप्नपूर्ती.

आज कार्यक्षेत्राची भ्रमंती करत असताना असे वाटले की, आता थकलो – कॅम्पला जाऊन थोडा आराम करावा. पण असं म्हणतात, जी स्वप्नं झोपल्यावर पडतात ती फक्त स्वप्न असतात, पण जी तुम्हाला झोपू देत नाहीत तीच खरी स्वप्नं असतात – जी पूर्ण केल्या शिवाय मनाला शांतता मिळत नाही. आज ते प्रत्यक्ष अनुभूतीतून वास्तव्यात आले आणि हे कृतीतून दिसले अखंड अविरत प्रयत्न करत असताना मनात कुठे तरी धाकधूक होती ह्या वेळी आपल्याला यश मिळावे त्यामुळे विचार न करता भर उंन्हात मी माझी गाडी नदीच्या पाण्याजवळ घेऊन जात असताना माझ्या सोबत असलेला कपिल ला म्हटले माझ्याकडे दुर्बीण दे मला काही तरी दिसतंय संशोधन अभ्यास नी टिटवीवर असल्यामुळे माझी नजर तापी नदीच्या मोठ्या पात्रावर टिपून असायची कारण नदी टिटवी सहसा नदीच्या पात्रातच आढळते.

टिटवीचे अवलंबत्व पाण्यावर असले तरी नदी टिटवीचे घरटे सहसा नदीच्या पात्रात असलेल्या वाळूच्या बेटांवर, रेतीच्या किनाऱ्यावर किंवा खडकाळ भागांवर आढळते. ही घरटी अतिशय साधी असतात – रेतीवर किंवा खडका शेजारी केलेली छोटीशी खोलगट जागा, जिथे ती अंडी घालते. जरी घरटे बनवताना ती पाण्यापासून लांब दूर माळरानावर सुद्धा जाते. तरीही अंड्यांचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी ती दुपारी सतत घरट्या जवळच राहते. ऊन तीव्र असताना अंड्यांना सावली देऊन त्यांचे रक्षण करते, तर कधी गरज पडल्यास अंडी थंड ठेवण्या साठी ती स्वतःला भिजवून ही परत येते. तसेस अशा ठिकाणी त्यांच्या घरट्यांचे वास्तव्य करते की जेणे करून अंडे कोणत्या प्राण्याला दिसता कामा नये म्हणून त्यांची अंडी सुद्धा केमोफ्लेज असतात आणि घरटे आसपासच्या निसर्गाशी इतके एकरूप असते की ते सहज लक्षात ही येत नाही.

स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी या ओळींची खरी व्याप्ती मला आज नदीटिटवी कडून जिवंतपणे अनुभवता आली. रखरखत्या सूर्याच्या तप्त उन्हात, जेव्हा टिटवी तिच्या अंड्यांचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी धडपड करत होती, तेव्हा तिच्या मातेच्या ममतेचे, वात्सल्याचे प्रतीक मला स्पष्ट दिसले. ती स्वतःला उन्हात झिजवते, पण अंड्यांवर संकट येऊ देत नाही – हे पाहून त्या आईचे निश्चल प्रेममला अंतर्मुख करून गेले. निसर्गाची लीला काय अफाट आहे सतत घरटयाचे तिचे रक्षण करणे ते ही भक्षकाला त्याचा पत्ता न लागू देता खुल्या

मैदानात आणि उघड्या आकाशात त्यांची दिनरात काळजी करणे व आपले अस्तित्व टिकवणे ह्याला जीवन म्हणावे.

काल नदीटिटवीच्या मिळालेल्या अंड्यांचा यशापर्यंतचे थांबायचे नव्हते नवीन येणाऱ्या दिवसाच्या सूर्यप्रकाशापासून धडा घेत नवीन पाठाची सुरुवात आज करायची होती कालच्या प्रयत्न नंतर रात्री निवांत आणि गाढ झोप लागली दिवसभर केलेल्या कसरतीमुळे दामाजीपुरा कॅम्पमधील असणाऱ्या डासांसोबत मैत्री करत मचांवर आणि खुल्या आकाशात चांदण्याच्या छताखाली अगदी गोडसाखर झोप घेतली पहिल्या सूर्य किरणा सोबतच झोप पूर्ण झाली आणि कपिल व मी आपले दिनचर्या आटपून पहाटे संशोधन क्षेत्राकडे पोहोचलो मनात बरेच प्रश्न गोंधळ घालत होते कपिल आणि मी एकाच विचार करत होतो आपल्याकडे ना ट्रॅपकॅमेरा आहे ना गोप्रोकॅमेरा आहे. आता नदीटिटवीच्या हालचालींवर लक्ष कसे ठेवण्यात येईल तेवढ्यात वाघसरांसोबत झालेले बोलणे आठवले सरांनी पुन्हा जाताना कॅमेरा घेऊन जाण्याची ग्वाही दिली परंतु आज मिळालेली ही संधी पुन्हा मिळेल याची शाश्वती नव्हती पण असे म्हणतात ना की इच्छा तिथे मार्ग म्हणून माझी धाव माझ्या मोबाईल कडे गेली आणि ठरवलं आज आपला मोबाईल ट्रॅप कॅमेऱ्याचे काम करेल म्हणून टाईमस्लॅब मध्ये कॅमेराची सेटिंग करून तो मोबाईल ठेवण्यात आला. पण पुन्हा सरांचे शब्द आठवले डोन्ट डिस्टर्ब देअर नेस्ट ! मग अजूनच घाम सुटला रखरखत्या उन्हात हे सगळं आवरण आणि सांभाळणं खूप जोखमीचं काम होतं परंतु ते काम आपण व्यवस्थितरित्या करू शकतो याबद्दल विश्वास मनात आलेला होताच म्हणून सगळ्या गोष्टींचा विचार करत टिटवीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचा प्रयत्न मी करत असताना आमचे पाच सहा डाव हे व्यर्थ गेले परंतु येणारा क्षण हा सुखाचा असेल हे भासू लागले होते तेवढ्यात येणाऱ्या क्षणाचे सगळे दृश्य मोबाईल कॅमेरात कैद झाले

प्रखर आणि रखरखत्या उन्हात नदीटिटवी आपल्या अंड्यांचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत असते. ती तापी नदीच्या पात्रातून ओल्या शरीराने येते आणि अंड्यांना थंड ठेवण्यासाठी त्यावर बसते नदी पात्रातून माळरानावर वसलेल्या घरट्यांवर येऊन ती अंड्यांचे तापमान संतुलित ठेवते आणि ही प्रक्रिया ती अविरत पणे चालू ठेवते.

हे दृश्य केवळ पाहण्या सारखे नसून, मनाला भिडणारे आणि अंतःकरण हेलावणारे असते. असा एकेक क्षण मनात साठवून ठेवावा असे वाटते. या अविस्मरणीय क्षणांची प्रत्यक्ष अनुभूती इतरांनाही मिळावी यासाठी मी व्हिडिओग्राफी आणि फोटोग्राफीच्या माध्यमातून त्याला कैद करण्याचा एक अल्पसा प्रयत्न केला.

मेळघाट दौऱ्यादरम्यान असे अनेक विस्मयकारक अनुभव घेता आले. आजचा दिवस ही त्याच अद्वितीय क्षणांपैकी एक होता – मनावर कायमचा कोरला गेलेला!

मेळघाटातील नदी परिसंस्थेतील जैवविविधतेचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी प्रशासन, स्थानिक नागरिक, निसर्गमित्र, वन्यजीव प्रेमी आणि संशोधक यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. या परिसंस्थेतील जैवविविधतेचे रक्षण आणि संवर्धन हे भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मेळघाटातील नदी परिसंस्थेतील पक्षी जैवविविधता महत्वाची असून पुढील अभ्यासाकरिता मोलाची ठरणार आहे. हे संशोधन करण्या करिता मेळघाट व्याघ्र प्रकल्पांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

*****

## ८ वे शालेय पक्षीमित्र संमेलन संपन्न



अकोला. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षीनिरीक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेला संपुर्ण भारतात एकमेव उपक्रम म्हणून ओळखलं जाणारे शालेय पक्षिमित्र संमेलनाचे ८ वे शालेय पक्षिमित्र संमेलन लोकमान्य टिळक सभागृहात नुकतेच पार पडले . शिक्षणाधिकारी माध्य, जि.प. अकोला, निसर्गकट्टा, वन विभाग सामाजिक वनिकरण विभाग व महाराष्ट्र पक्षिमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या संमेलनात राजेश्वर कॉन्व्हेंट, जिजाऊ कन्या विद्यालय, न्यु इंग्लिश हायस्कुल, जि.डी. प्लॅटिनम ज्युबिली हायस्कुल, सन्मित्र पब्लिक स्कुल, ज्युबिली इंग्लिश हायस्कुल, मोहरीदेवी खंडेलवाल कन्या विद्यालय इ. शाळेतील निसर्गकट्टा इको क्लबच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्या पक्षी निरीक्षण छंदा विषयी विविध कार्यक्रमातून माहिती देण्यात आली होती त्या आधारे पोस्टर स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, पक्षी कट-आऊट स्पर्धा व प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या संमेलनात बुलढाणा येथील बाल पक्षिमित्र चि. क्षितीज गजेंद्र निकम याने माझे पक्षीनिरीक्षण , जळगाव येथील युवा पक्षीमित्र कु. सौरभ महाजन यांनी पक्षीनिरीक्षण एक छंद व पाटेकर मॅडम डॉ. विजयश्री हेमके, मॅडम सह. प्राध्यापिका, प्राणी शास्त्र विभाग, श्री. शिवाजी कॉलेज, चिखली. यांनी पक्षांवरील विविध माहितीवर स्लाईड शो द्वारे मार्गदर्शन केले.

# पक्षीकट्टाच्या निमित्ताने



**श्री. विलास देशमुख**
उपसंपादक,
नवराष्ट्र अकोला.

निसर्गाचा डासळणारा समतोल सर्वांसाठीच चिंतेचा विषय बनला आहे. पर्यावरण वाचविण्याच्या गोष्टी करणारेच जर पर्यावरणास हानी पोहोचवत असतील, तर पर्यावरण वाचविणार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर अनेकजण गप्पा ठोकतात, मात्र कृती फार कमी लोकांकडून होताना दिसते.

पर्यावरणाचा थर्मामिटर गणल्या जाणाऱ्या पक्ष्यांविषयी फारशी आस्था सर्वसामान्यांमध्ये दिसून येत नाही.पक्षी हा पर्यावरणातील अनन्य साधारण घटक असून सर्वसामान्यांना कावळा, चिमणी या पलीकडे पक्ष्यांची नावे माहिती नसतात. पक्ष्यांच्या प्रजाती, त्यांचा अधिवास, पक्षी स्थलांतर, पक्ष्यांसमोरील समस्या, पक्षी संवर्धनाकरीता सामान्य माणसाची भूमिका या बाबी तर मग खूपच दूरच्या आहे . त्यामुळे पक्षीनिरीक्षणाचा छंद सर्वसामान्यांमध्ये जडावा व त्यामाध्यमातून पक्षी संवर्धनाच्या मोहिमेला हातभार लागावा म्हणून महाराष्ट्र पक्षिमित्र संघटना व अकोल्यात बालवयापासून विद्यार्थ्यांवर हिरवे संस्कार घालण्यासाठी झटणा-या निसर्गकट्टाच्या माध्यमातून श्री. अमोल सावंत यांनी दि. १४ नोव्हेंबर २०२३ मध्ये पक्षीकट्टा या उपक्रमाच्या संकल्पनेची मुहूर्तमेढ रोवली.पक्षीकट्टा म्हणजे काय? तर ४-५ समविचारी माणसांनी एकत्र भेटून चर्चा व कृती करण्याची जागा म्हणजे कट्टा. याच कट्टा चा उपयोग अकोल्यातील महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे सदस्यांनी महिन्यातून एका रविवारी जिल्ह्यातील एखाद्या जलाशयावर किंवा पक्षीनिरीक्षणाच्या स्थळावर सकाळच्या सुमारास जमून तेथील पक्ष्यांचे निरीक्षण, त्यांची माहिती गोळा करणे, त्यांच्या अधिवासाचा अभ्यास करणे, तेथील समस्या नोंदविणे , नविन लोकांना या चळवळीत समावून घेणे इ. गोष्टी या पक्षीकट्टावर होत असतात. प्रत्येक पक्षीकट्टाच्या समन्वयकाची जबाबदारी एका सदस्यांवर सोपवली जाते. मग त्या सदस्याने स्थळ निश्चिती करून पोस्टर च्या माध्यमातून सर्व लोकांना निमंत्रीत करायचे. नियोजित ठिकाणी एकत्र आल्यावर सर्वांचे स्वागत करून महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेची माहिती सांगणे , पक्षीमित्र त्रैमासिक आले असता त्याचे वाटप करणे, सर्वांच्या नोंदी घेणे व पक्षी निरीक्षण संपल्यावर सर्वांचे आभार मानणे इ. प्रत्येक वेळी समन्वयकाची जबाबदारी नविन सदस्यांना देण्यात येते जेणे करून त्यांच्या माध्यमातून नविन लोक या पक्षी संवर्धनाच्या चळवळीशी जोडले जावे.उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ परिसरात खास बाल पक्षीमित्र कट्टाचे आयोजन करण्यात आले होते. या बाल पक्षीमित्र कट्टा वर २५ शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह सहभाग नोंदवला होता.गेल्या वर्षभरात प्रत्येक महिन्यात आयोजित केलेल्या पक्षीकट्टावर जवळपास १५० लोकांनी सहभाग नोंदवला होता. तसेच या पक्षीकट्ट्याच्या माध्यमातून अनेकांमध्ये हिरवे संस्कार रुजले असून अनेकजण पक्षी अभ्यासाकडे वळले आहेत. दिवसेंदिवस त्यात अनेकविध लोक जुळत त्याला एका छानशा उपक्रमाचे स्वरुप आले आहे. या पक्षीकट्टाच्या माध्यमातून ७ नविन सदस्य महाराष्ट्र पक्षीमित्रला जुळले. अकोल्याती जिल्ह्यातील कापशी, आखतवाडा, कुंभारी, दगडपारवा, आगर, दुधाळा, सिसामासा, बोरगावमंजू आदींसह अनेक जलाशयांवर पक्षीकट्टाच्या माध्यमातून भेटी देऊन बर्ड चेकलिस्ट तयार करून आंतरराष्ट्रीय स्तरावरील ई-बर्डवर नोंदविण्यात आल्या.पक्षीकट्टा नियमित सुरू ठेवण्यासाठी व अधिकाधिक बहरण्यासाठी महाराष्ट्र पक्षी मित्र चे विदर्भ समन्वयक (अमरावती विभाग) श्री. अमोल सावंत, अकोला जिल्हा समन्वयक डॉ. मिलिंद शिरभाते, सदस्य डॉ.संतोष सुरडकर, श्री. मनोज लेखनार, डॉ. हरिष मालपाणी, श्री. अजय फाले, श्री. विलास देशमुख हे लोक सतत प्रयत्नशील असतात.

*****



छायाचित्राची गोष्ट

# ताम्हिणीच्या साक्षीने : रंगांच्या पंखांचा अद्भुत क्षण




**अमेय ठाकरे**
पक्षी-अभ्यासक,अमरावती
Email - ameythakare.photography@gmail.com

किंगफिशरच्या भक्ष्यासह टिपलेला क्षण तांबूस नारिंगी चोच, निळसर काळसर पंख, आणि डोळ्याला भुरळ घालणारे रंग ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर (ODKF) या लहानशा पण अत्यंत देखण्या पक्ष्याचे पहिलेच चित्र मी २०२१ साली इंटरनेटवर पाहिले होते. आणि त्या क्षणापासूनच, तो पक्षी प्रत्यक्ष पाहण्याची आणि त्याचे उत्तम चित्र टिपण्याची एक आंतरिक ओढच निर्माण झाली. ही ओढ अखेर २०२४ च्या पावसाळ्यात पूर्णत्वास गेली, जेव्हा मी माझ्या एका छायाचित्रकार मित्रासह पुण्याजवळील तम्हिणी घाटात ODKF च्या नेस्टिंग साइटकडे निघालो. तो ऑगस्ट महिना होता, आणि पावसाच्या लहरी कुठल्याही क्षणी येण्याची शक्यता होती. पण आम्ही सकाळी लवकर निघालो, कारण या पक्ष्याची सक्रीयता मुख्यतः सकाळच्या वेळातच जास्त दिसते. ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर भारतात आढळणाऱ्या सर्वात लहान व रंगीत मासेमार पक्ष्यांपैकी एक आहे. तो आंशिक स्थलांतर करणारा असून भारत व आग्नेय आशियामध्ये आढळतो. प्रामुख्याने घनदाट जंगलांतील नद्यांच्या किनाऱ्यांवर तो वास्तव्य करतो आणि पावसाळ्यात, म्हणजेच जुलै ते सप्टेंबर दरम्यान, नर आणि मादी मिळून प्रवाहाच्या काठावर खोबणी खोदून अंडी घालतात. ही अंडी प्रामुख्याने ऑगस्टमध्ये उबवली जातात, आणि त्याच काळात त्यांचे भरवण्याचे काम उफाळून येते – जे पाहण्यासाठी आम्ही तिथे उपस्थित होतो. आम्ही त्या नेस्टजवळ एका लपण्याच्या जागी – 'हाईड' मध्ये जाऊन बसलो होतो. कॅमेऱ्याचे फक्त लेन्स बाहेर ठेवले होते, समोर एक ठराविक फांदी होती जिथे पक्षी बसून मग नेस्टमध्ये शिरायचा. माझा उद्देश होता – त्या फांदीवर पक्षी भक्ष्यासह बसलेला क्षण टिपण्याचा. तो क्षण ज्या प्रकारे मी कल्पनेत पाहिला होता – जिवंत रंग, भक्ष्य चोचीत, आणि समोरून दिसणारा संपूर्ण पक्षी – तोच साकार करण्याचा प्रयत्न होता. पहिल्या काही वेळांमध्ये अनेक अडचणी आल्या – कधी प्रकाश कमी, कधी भक्ष्य फारच लहान, कधी वेळ मिळायचा नाही पण प्रत्येक फ्रेममागे मी शिकत होतो. आणि मग, एका क्षणी – तो आला! त्या छोट्याशा चोचीत एक लहानसा बेडूक, तो पक्षी अगदी योग्य कोनात फांदीवर बसला, प्रकाश देखील अगदी योग्य होता – आणि मी क्लिक केलं ! क्षणभर श्वास रोखून ठेवला होता. जणू सगळं विश्व त्या एका क्षणात गोठलेलं. माझं वर्षानुवर्षांचं स्वप्न त्या एका क्लिकमध्ये साकार झालं होतं. हाच तो फोटो – जो या लेखासोबत प्रकाशित झाला आहे. या पक्ष्याचं आयुष्य, त्याची कष्टमय जीवनशैली, निसर्गाशी जुळवून घेत असलेली त्याची लढाई – हे सर्वच मला कायमच प्रेरणादायक वाटलं आहे.एवढ्या प्रतिकूल वातावरणात, झपाट्याने वाहणाऱ्या पाण्यात खोबण खोदणं, चार-पाच पिल्लं वाढवणं आणि त्यासाठी दिवस भर भक्ष्य आणणं – ही एक असामान्य गोष्टच आहे. हा फोटो मिळवण्यासाठी मला तब्बल तीन वर्षं वाट बघावी लागली. भर पावसात अनेक वेळा प्रवास केला, कधी पाण्यात उभा राहिलो, कधी जोरदार पावसातही कॅमेरा सांभाळला. पण त्या दिवशी तर परीक्षा अधिकच कठीण होती – माझे पाय अर्धा फूट पाण्यात बुडालेले, पावसाचा जोर वाढलेला, आणि नदीचं पाणी सातत्याने वाढत होतं. पण माझ्या स्वप्नापुढे ही सगळी अडचण छोटी होती. त्या क्षणाची प्रतीक्षा, माझी श्रद्धा आणि चिकाटी अखेर यशस्वी ठरली. हा अनुभव केवळ एक फोटो मिळवण्यापुरता मर्यादित नाही, तर हा आहे निसर्गाशी जोडलेला एक आत्मिक संवाद. ज्या क्षणी त्या पक्ष्याने फांदीवर पाऊल टाकलं, त्या क्षणी जणू निसर्गानेच माझ्या स्वप्नाला आशीर्वाद दिला. हा क्षण माझ्यासाठी केवळ छायाचित्रणाचाच नाही, तर जीवनातल्या सर्वात खास आणि अमूल्य क्षणांपैकी एक आहे. ज्यात माझं स्वप्न, प्रयत्न, निसर्गप्रेम आणि श्रद्धा – हे सगळं एका अद्वितीय फ्रेममध्ये साकार झालं.



*****



अरण्यऋषी पक्षिमित्र

**श्री. मारुती चित्तमपल्ली** यांना

भारत सरकारने **पद्मश्री** देऊन सन्मानित केले.

महाराष्ट्र पक्षिमित्र साठी हा अभिमानाचा क्षण आहे.

आदरणीय चितमपल्ली सरांचे

## मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन.





सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेचे **श्री. विश्वास दत्तात्रय काटदरे उर्फ (भाऊ काटदरे)** यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या हस्ते मटा सन्मान २०२५ च्या **'वसुंधरा साथी सन्मान' पुरस्काराने सन्मानित** करण्यात आले

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या योजनेअंतर्गत बाल विभागातील कथा (छोट्या गोष्टी, परीकथा, लोककथांसह) या वाङ्मय प्रकारासाठी दिला जाणारा **राजा मंगळवेढेकर पुरस्कार** 'कोतवाल' या साहित्यकृतीसाठी **जेष्ठ पक्षीसंशोधक श्री. शरद आपटे** यांना प्रदान करण्यात आला.





राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार तर्फे स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्र पोटे उत्कृष्ट **वाङ्मय निर्मिती पुरस्कार २०२४** वितरण समारंभामध्ये **थाई–थाई** या पुस्तकासाठी प्रोत्साहन पुरस्कार प्रदान करून पक्षी अभ्यासक **श्री. किरण मोरे** यांना सन्मानित करण्यात आले.

**टपाल तिकिटांच्या दुनियेत**

# तांबट

## Coppersmith Barbet (Xantholaema haemacephala)



**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

तांबट हा पक्षी महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर सर्वत्र आढळतो. साधारण चिमणीच्या आकाराचा असतो. हा पक्षी तांबूस रंगाचा असतो. याचे कपाळ व छाती किरमिजी रंगाची असते. डोळयांच्या वर व खाली अर्ध वर्तुळाकार पिवळे पटटे असतात, कंठ पिवळा असतो. नाकावरही लाल रंग असतो. पोटाचा भाग पिवळट पांढरट असतो व त्यावर तुरळक हिरव्या रेषा असतात. तांबटाचे पाय लाल असतात चोच पिवळी असते व त्यावर केसासारखी बारीक पिसे असतात. शेपूट आखूड हिरव्या रंगाची असते.

हा पक्षी तांब्याच्या हंडीवर हातोड्याचा घाव घातल्यावर जसा आवाज येतो तशाच पद्धतीने ओरडतो म्हणून त्यास मराठीत 'तांबट' या नावाने ओळखले जाते तर काही स्थानिक ठिकाणी पुक पुक्या असेही संबोधले जाते. हिंदी मध्ये छोटा बसंत असे नांव आहे. तांबट पक्षी उन्हाळयाच्या दिवसात झाडांवर दिवस भर पक्पक' असा आवाज काढत रहातो. आवाजाच्या प्रत्येक ठोक्याला किरमीजी रंगाचा गळा फुगवतांना दिसतो तसेच शेपटीला हलकासा झटका देत असतो. सारखी मान वळवत असल्याने आवाज वेगवेगळ्या दिशेने पैकु येतो त्यामुळे झाडावर सहजा सहजी शोधणे कठीण जाते.

हा पक्षी अतिशय दाट झाडीत रहातो. प्रामुख्याने वड, पिंपळ, उंबर व जांभूळ अशा स्थानिक झाडांवर रहाणे पसंत करतो व या झाडांवरीले फळे खातो, रसयुक्त फळे, फुलांच्या पाकळया आणि ठराविक किटक सुद्धा खातो. हा पक्षी सुकलेल्या ठिसूळ खोडाच्या फांदीवर चोचीने टोचून घरटे तयार करतो हे घरटे रूपयाच्या आकाराचे बीळ असते. आडव्या फांदीवरील बिळाला खालून प्रवेशद्वार असते त्यात मादी तीन पांढरी अंडी घालते. नर-मादी दोघेही संगोपन करतात. पुढील विणीच्या हंगामात त्याच फांदीवर दुसरे बीळ पोखरतात. त्याची जुनी घरटी खारी व इतर लहान पक्षी वापरतात.

अशा या सुंदर पक्ष्यावर श्रीलंका देशाच्या टपाल विभागाने श्रीलंकेतील स्थानिक पक्ष्यांवरील तिकीट मालिकेमध्ये साडे चार रूपये किंमतीचे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे.

*****




पक्षी निरीक्षण व वन भ्रमंतीसाठी
उत्तम ठिकाण
Katepurna Sanctuary
काटेपूर्णा
वन्यजीव अभयारण्य
वाघा, अकोला-मंगरुळपीर रोड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला
काटेपुर्णा अभयारण्यातील जैवविविधता
१२३ प्रजातींचे पक्षी
४८ प्रकारचे फुलपाखरं
२५ प्रकारचे सस्तन प्राणी
अत्याधुनिक निसर्ग माहिती केंद्र
नेचर ट्रेल
जंगल सफारीसाठी बस व जिप्सी उपलब्ध
५१ वृक्ष प्रजाती
२३ झुडूप प्रजाती
१८ गवतांच्या प्रजाती
बोटींग
HINDU HRUDAYSAMRAT BALASAHEB THACKERAY MAHARASHTRA SAMRUDDHI MAHAMARG
समृद्धी महामार्ग शेलु बाजार/ वनोजा टर्मिनल (IC-9) जवळून फक्त ९ किमी अंतर
अकोला शहरापासून ३२ कि.मी.
निवास व्यवस्था
KARANJA SOHOL WILDLIFE SANCTUARY
गवताळ प्रदेशाचे नंदनवन
कारंजा सोहोळ वन्यजीव अभयारण्य
गिर्डा, कारंजा-मानोरा रोड, ता.कारंजा, जि. वाशिम
HINDU HRUDAYSAMRAT BALASAHEB THACKERAY MAHARASHTRA SAMRUDDHI MAHAMARG
समृद्धी महामार्ग कारंजा टर्मिनल (IC-8) जवळून फक्त १५ किमी अंतर
कारंजा शहरापासून १२ कि.मी.
अकोला वन्यजीव विभाग, अकोला
अकोला वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय, शेलु , ता. मंगरूळपीर, जि. वाशिम
अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी संपर्क
काटेपुर्णा अभयारण्य
श्री. प्रविण कांबळे (वनरक्षक) -7350019883
श्री. नागसेन आकोडे (गाईड)-8830927586
कारंजा सोहोळ अभयारण्य
श्री. दिपक गिरी (वनरक्षक) - 8605287612
श्री. राजेंद्र मनवर (गाईड) - 9322017091
For online accommodation booking : safaribooking.mahaforest.gov.in

# छायाचित्राची गोष्ट

## तम्हिणीच्या साक्षीने : रंगांच्या पंखांचा अद्भुत क्षण



एका क्षणी – तो आला! त्या छोट्याशा चोचीत एक लहानसा बेडूक, तो पक्षी अगदी योग्य कोनात फांदीवर बसला, प्रकाश देखील अगदी योग्य होता आणि मी क्लिक केलं ! क्षणभर श्वास रोखून ठेवला होता. जणू सगळं विश्व त्या एका क्षणात गोठलेलं.



छायाचित्रकार
**अमेय ठाकरे**
पक्षी-अभ्यासक, अमरावती

**पक्षिमित्र**

संपादक : किरण मोरे
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन

पोस्टमन दादा,
या मासिकात पक्षी संवर्धनाची अनमोल माहिती आहे,
तेव्हा हे मासिक सुखरूप पोहचवा,
व पक्षी संवर्धनास सहकार्य करा..
धन्यवाद !
तुमचीच -चिऊताई


प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षीमित्र**
६३, अरण्यार्पन, समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती - ४४४६०४
E-mail : *pakshimitra@gmail.com*
Website : *www.pakshimitra.org*
Mob.: +91 7030101981


Book Post

प्रती,